POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२५४ ● मुंबई, बुधवार, १६ एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## महाराष्ट्रातील ८ लाख लाडक्या बहिर्णींना १५०० ऐवजी ५०० रुपयेच मिळणार

**■मुंबई । प्रतिनिधी :**

लोकसभा निवडणुकीत फटका पडल्यानंतर महाराष्ट्र सरकारने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात लाडकी बहीण योजना आणली. याअंतर्हत पात्र महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा करण्यात येतात. विधानसभा निवडणुकीत सरकार पुन्हा सत्तेत आल्यास ही रक्कम २१०० रुपये करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. राज्यातील महिला २१०० रुपये कधी मिळणार या प्रतिक्षेत असताना लाडकी बहीण योजनेतील ८ लाख महिलांसाठी धक्कादायक बातमी समोर आली आहे.

महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने संदर्भात मोठी अपडेट दिली आहे. यामुळे ८ लाख लाभार्थी महिलांना धक्का बसणार आहे. कारण या अपडेटनुसार ८ लाख महिलांचे मासिक स्टायपेंड कमी करण्यात आले आहे. यानंतर महिलांमध्ये चिंतेचे वातवरण असून विरोधकांनी संताप व्यक्त करत सरकारच्या धोरणाचा निषेध केलाय.

लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या अनेक महिलांना नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत आधीच लाभ मिळतोय. राज्यातील अशा महिलांची आकडेवारी साधारण ८ लाख इतकी आहे. अशा महिलांना



आता लाडकी बहीण योजनेअंतर्गत १,५०० रुपयांऐवजी ५०० रुपये मासिक मिळणार आहेत.

नमो शेतकरी योजनेतून १ हजार रुपये मिळत असलेल्या महिलांना लाडकी बहीण योजनेच्या नियमानुसार लाभार्थ्यांना इतर सरकारी योजनांचा लाभ घेता येईल. पण त्यांचा एकूण मासिक लाभ १ हजार ५०० रुपयांपर्यंत मर्यादित राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

विधानसभा निवडणुकीआधी लाडकी बहीण योजना सुरु झाली तेव्हा महिलांना सरसकट लाभ देण्यात आला होता. यात पात्र, अपात्र अशा दोन्ही प्रकारच्या महिलांनी अर्ज केले. पण विधानसभा निवडणुकीनंतर राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभ मिळणाऱ्या महिलांची कागदपत्र पडताळणी केली. यातून अपात्र ठरलेल्या महिलांना योजनेच्या लाभातून वगळले. आता पात्र व्यक्तींनाच स्टायपेंड मिळणार आहे. ऑक्टोबरमध्ये या योजनेसाठी २.६३ कोटी अर्ज आले होते. तपासणी प्रक्रियेनंतर ही संख्या ११ लाखांनी कमी झाली. त्यामुळे फेब्रुवारीपर्यंत २.५२ कोटी महिला लाभार्थ्यांना योजनेचे पैसे मिळाले. फेब्रुवारी आणि मार्चमध्ये अंतिम स्टायपेंड २.४६ लाख लाभार्थ्यांना देण्यात आला. यातूनही आता नमो शेतकरी योजनेचा लाभ घेणाऱ्यांना १५०० रुपयाऐंवजी फक्त १००० रुपये मिळणार आहेत.

लाडकी बहीण निधी कपातींवरून विरोधकांनी सरकारवर हल्लाबोल केलाय. लाडक्या बहिणींचा निधी आता ५०० रुपयांवर आलाय, त्यांच्या मतांची किंमत हळूहळू शून्यावर येईल असे ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत म्हणाले. बहिणींना ५०० रुपये देणाऱ्या सरकारची कीव येतेय. -केंद्राचे पैसे मिळतात म्हणून निधी कमी करणे हे चूक असल्याचं म्हणत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारांनी घणाघात केलाय.

### कोणत्या लाडक्या बहिर्णींना मिळणार फक्त ५०० रुपये?

- लाडकी बहीण योजनेतील अटीनुसार एका सरकारी योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांना दुसऱ्या सरकारी योजनेचा लाभ घेता येत नाही.
- महाराष्ट्र शासनाने यंदाच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी नमो शेतकरी योजना अंतर्गत वर्षाला ६००० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता.
- प्रधानमंत्री सम्मान निधी योजना ही केंद्र शासनाच्या माध्यमातून चालवली जाते. यानंतर महाराष्ट्र शासनाद्वारे नमो शेतकरी योजना राबवण्यात येत आहे.
- या योजनेअंतर्गत राज्य सरकारकडून वार्षिक ६००० रुपये शेतकऱ्यांना दिले जातात. तर केंद्र शासनाद्वारे ६००० म्हणजेच एकूण १२००० रुपये शेतकऱ्यांना दिले जातात.
- यानुसार सध्या ज्या महिला नमो शेतकरी योजनेचा लाभ घेत आहेत, त्यांना दर महिना १००० रुपये दिले जात आहेत.
- त्यामुळे आता ज्या महिला नमो शेतकरी योजनेचा लाभ घेत आहेत, त्यांना लाडकी बहीण योजनेचे १५०० रुयपांऐवजी फक्त ५०० रुपये दिले जाणार आहेत.

## मुंबईत ठाकरे गटाचा हंडा मोर्चा
## शिवसैनिकांची मोठ्या प्रमाणात धरपकड

**■मुंबई । प्रतिनिधी :**

दादरमध्ये शिवसेना ठाकरे गटाकडून हंडा मोर्चा काढण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून दादर, माहिम आणि शिवाजी पार्क परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. यामुळे आता ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेत पालिका कार्यालयावर हंडा मोर्चा काढला आहे. सध्या या परिसरात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची धरपकड सुरु आहे.

सध्या शिवसेना भवन परिसरात पोलीस दाखल झाले आहेत. या आंदोलकांना अडवण्याचा प्रयत्न केला जात



गेल्या काही दिवसांपासून दादर, माहिम आणि शिवाजी पार्क परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. याच कारणाने आता शिवसेना ठाकरे गटातील पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. शिवसेना भवन परिसरात ठाकरे गटाकडून हंडा मोर्चा काढण्यात आला आहे. यावेळी मोठ्या संख्येने शिवसैनिक जमले होते. आमदार महेश सावंत यांच्या नेतृत्वात पालिका कार्यालयावर हा हंडा मोर्चा काढण्यात आला. यावेळी ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांकडून जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली.

आहे. जोपर्यंत पाणी नाही, तोपर्यंत संघर्ष थांबणार नाही, असे फलक हातात घेऊन सध्या आंदोलक जोरदार घोषणाबाजी करत आहेत. सध्या पोलिसांकडून या आंदोलकांची धरपकड सुरु आहे. अनेक महिला कार्यकर्त्याही या आंदोलनात सहभागी झाल्या आहेत. ठाकरे गटाकडून हा हंडा मोर्चा सुरु आहे.

आम्ही शांतपणे मोर्चा काढतोय. माझ्या हातात हंडा नाही. आम्ही इथून अजिबात हटणार नाही, अशी आक्रमक प्रतिक्रिया शिवसेना नेत्या श्रद्धा जाधव यांनी दिली. तर महेश सावंत यांनी पोलिसांकडून मोर्चाला कधीच परवानगी दिली जात नाही. आम्ही पालिका कार्यालयावर जाणारच आहोत. आम्हाला अडवलं तरी जाणार आहोत, असे महेश सावंत यांनी म्हटले.

## मुस्लीम या देशात कायद्यात राहिले तर फायद्यात...
## धीरेंद्र शास्त्री महाराज नेमके काय म्हणाले?

**■मुंबई । प्रतिनिधी :**

हिंदुस्थानमध्ये राहणारा प्रत्येक जण हिंदू आहे. आम्ही मुस्लिम विरोधी नाही. या देशाने एपीजे अब्दुल कलाम यांना स्वीकारले. तसेच इतरांनाही स्वीकरले. परंतु आज भयप्रद वातावरणामुळे पश्चिम बंगालमधून हिंदू पलायन करीत आहेत. उद्या महाराष्ट्रमध्ये करतील. पुढे मध्य प्रदेशमध्ये होईल. एका विशेष समुदायाकडून हिंदुना घाबरवण्याचे प्रयत्न येथील सरकारच्या मदतीने सुरू आहे, हे निंदनीय आहे. मुस्लीम या देशातील कायद्यात राहिले तर फायद्यात राहतील, असे धीरेंद्र शास्त्री महाराज यांनी म्हटले आहे.



देशातील दुसरे आणि महाराष्ट्रातील पहिले श्री बागेश्वर बालाजी सनातन मठ भिवंडीतील हायवे दिवे येथे तयार झाले. श्री बागेश्वर मठाचे मठाधिपती पंडित धीरेंद्र कृष्णा शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली बनवण्यात आलेल्या श्री बागेश्वर बालाजी सनातन मठाचा लोकार्पण सोमवारी झाले. यावेळी धीरेंद्र शास्त्री बोलत होते. ते म्हणाले, महाराष्ट्रातील सर्वसाधारण गोरगरीब बागेश्वर बालाजी भक्तांना मध्यप्रदेश येथे जाणे शक्य होत नाही, अशा भक्तांसाठी भिवंडी येथील बागेश्वर बालाजी धाम ही पर्वणी आहे. हे मठ सनातन धर्म प्रसाराचे केंद्र व भक्तांसाठी आस्थेचे श्रद्धास्थान बनणार आहे, असे प्रतिपादन बागेश्वर बालाजी धामचे प्रमुख धोरेंद्र महाराज शास्त्री यांनी केले आहे.

## नागपुरासह विदर्भालाही हवामान विभागाचा अलर्ट

**■नागपूर । प्रतिनिधी :**

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील हवामानात सातत्याने बदल होत आहेत. त्यातच आता हवामान विभागाने नागपूरसह विदर्भात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. पुढील एक ते दोन दिवसात नागपूरसह विदभार्तील काही भागांमध्ये अवकाळी पाऊस पडेल, अशी शक्यता नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भाच्या वातावरणात द्रोणिका (अप्पर टफ वे) आणि चक्रवाती वारे तयार झाले आहेत. यामुळे बंगालच्या खाडीतून मोठ्या प्रमाणात बाष्पयुक्त वारे विदर्भाकडे वाहत आहेत. याच कारणामुळे काही भागांमध्ये पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. यासोबतच विदभार्तील काही जिल्ह्यांमध्ये ढगांच्या गडगडाटासह विजा चमकण्याची शक्यता आहे. तसेच, काही ठिकाणी सोसाट्याचा वारा वाहू शकतो, ज्याची गती ताशी ४० ते ५० किलोमीटर इतकी राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या शक्यतेनुसार, विदर्भातील तापमान इतर दिवसांपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. रात्री उशिरा पावसाची शक्यता असल्याने दिवसाच्या तापमानावर विशेष परिणाम जाणवणार नाही. नागपूर प्रादेशिक हवामान विभागाचे शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील पाच दिवसांसाठी विदर्भात उष्णतेच्या लाटेचा कोणताही इशारा देण्यात आलेला नाही. तसेच कोकणातील मुंबईसह सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. राज्यातील इतर अनेक भागांमध्ये लवकरच पावसाची हजेरी लागणार असल्याने नागरिकांना उकाड्यांपासून दिलासा मिळेल.

## महायुतीमधील धुसफूस पुन्हा समोर!
## भाषण नाकारल्याने दोन्ही उपमुख्यमंत्री नाराज असल्याची चर्चा

**■मुंबई । प्रतिनिधी :**

आम्ही सगळे खूश असं म्हणणाऱ्या महायुतीतील धुसफूस पुन्हा एकदा समोर आली आहे. आणि आता तर दोन्ही उपमुख्यमंत्री नाराज असल्याची चर्चा आहे. चैत्यभूमीवरच्या अभिवादन सभेत राजशिष्टाचारानुसार भाषण नाकारल्यामुळे दोन्ही उपमुख्यमंत्री नाराज असल्याची माहिती आहे.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज चैत्यभूमीवर सरकारकडून अभिवादन सभा घेण्यात आली. साग्रसंगीत हा कार्यक्रम पार पडत असतानाच महायुतीत पुन्हा नाराजीनाट्य सुरू झालं. राजभवनाकडून देण्यात आलेल्या शेड्युलनुसार मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि त्यानंतर राज्यपाल यांचं भाषण नियोजित होतं. पण कार्यक्रमला बराचसा वेळ झाल्याने फक्त मुख्यमंत्री आणि राज्यपाल या दोघांनीच भाषणं केली. महत्वाच्या कार्यक्रमात दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना भाषणापासून वंचित ठेवण्यात आल्याने शिंदे आणि पवार नाराज असल्याची चर्चा रंगली.



तर मला याबद्दल काही वाटत नाही आणि भाषणामुळे आम्ही नाराज होणारे नाही, असं मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. भाषणावरून कुणीही नाराज नाही, सगळं ठरवून होतं. जाणीवपूर्वक काहीच नाही असं प्रवीण दरेकर यांनी म्हटलं आहे.

निधीवाटप, पालकमंत्रीपद यावरून महायुतीत गेल्या काही दिवसांपासून नाराजीचे वारे वाहत आहेत. रायगडावर शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमात अजित पवारांना भाषणाची संधी दिली नाही. आता बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमात दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना भाषणापासून लांब ठेवलं. त्यामुळे एकनाथ शिंदे आणि अजितदादांच्या ही गोष्ट जिव्हारी लागल्याचं दिसलं. त्यामुळे दोन्ही उप सध्या तापल्याचं दिसत आहे. आता मुख्यमंत्री फडवणीस नाराजी कशी दूर करतायेत, हे पाहावं लागेल.

## पुणे - जुन्नरमध्ये कांदा, टोमॅटो, रब्बी पिकांचं नुकसान

**■पुणे । प्रतिनिधी :**

पुणे जिल्ह्यातल्या जुन्नर तालुक्यात रविवारी अवकाळी पावसासह गारपिटीनं धुमाकूळ घातला. यात कांदा टोमॅटोसह अनेक रब्बी पिकांचं नुकसान झालं आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहे. टोमॅटोचं हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातल्या जुन्नर तालुक्याच्या पश्चिम पट्टयातील मढ परिसरात मातीच्या ढिराऱ्यावर गारांचा ढिगारा साचलेला दिसत आहे. या टपोऱ्या गारा दिसायला सुंदर दिसत असल्या तरी याच टपोऱ्या गारांनी शेतीचं वाटोळं केलं




एकीकडे चाळीशीपार अंगाची लाही लाही करणारा उन्हाळा आणि त्यात अचानक येणारा वादळी पाऊस आणि गारपीट. त्यामुळं हातातोंडाशी आलेली पिकं डोळ्यादेखत भिजताना, आणि नुकसान होताना शेतकऱ्यांना बघावं लागतं. एका पावसात शेकडो एकरातल्या पिकांचं नुकसान होत आहे. त्यामुळं सरकारकडून किमान याचे लवकर पंचनामे व्हावेत अशी आशा शेतकरी करत आहेत.

आहे. जुन्नर तालुक्यात अनेक गावात काल असाच गारपीटीसह आणि वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. यात टोमॅटो पिकांचं मोठं नुकसान झालं. गारपीटीनंतर शेतात गारांचा खच पडला होता. या गाऱ्याच्या माऱ्यानं टोमॅटोचा दर्जा खालावला. आता हा टोमॅटो पिकला तरी तो लवकर खराब होईल आणि त्याला बाजारभाव मिळणार नाही या भितीत शेतकरी आहे. तिच चिंता त्यांच्या बोलण्यातून जाणवत आहे. जी गत टोमॅटोची, तिच गत झाली जुन्नर तालुक्याच्या गोळेगाव परिसरातल्या कांदा पिकाची. गोळेगावात कांदा काढणी सुरु होती. काढलेला कांदा गोणीत भरुन शेतातच वाळायला ठेवला होता. मात्र वादळी पाऊस आणि गारांच्या माऱ्यानं काढलेला कांदा भिजून गेला आहे. आता हजारो रुपये खर्चून पिकवलेला हा कांदा शेतकऱ्यांना कवडीमोल बाजारभावात विकावा लागणार आहे. जुन्नरच्या सितेवाडी परिसरालाही गारपीटीच्या पावसाचा तडाखा बसला. यामुळं बाजरीची कणसं थाटांसह कली आहेत. बाजरीच्या कणसात पावसाचं पाणी गेल्यानं येत्या काळात ही बाजरी काळी पडू शकते. यामुळं अर्थातच बाजरीचा पोत खालावतो आणि मग बाजरीला दर मिळत नाही. त्यामुळं शेतकरी हतबल झाला आहे.

## धोनी, विराट, अंबानींचे फोटो दाखवून पुणेकराला घातला ३९ लाखांचा गंडा!

**■पुणे । प्रतिनिधी :**

पुण्यात सायबर फसवणुकीचा आणखी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कोथरूड येथील ३० वर्षीय प्रतीक घुगे या तरुणाने 'एव्हिएटर' नावाच्या ऑनलाइन गेमच्या नादात तब्बल ३९ लाख ७७ हजार रुपये गमावले आहेत. विशेष म्हणजे, क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनी, विराट कोहली आणि उद्योगपती अनंत अंबानी यांच्यासारख्या सेलिब्रिटींचे डीपफेक व्हिडीओ दाखवून तरुणाला या गेममध्ये गुंतविण्यात आले होते. विमान उडवण्याच्या एका विचित्र गेमच्या माध्मयातून या तरुणाला गंडा घालण्यात आला.




### एव्हिएटर गेम म्हणजे काय?

एव्हिएटर हा एक ऑनलाइन बेटिंग गेम आहे. यात स्क्रीनवर विमान उड्डाण करते आणि खेळाडूंना ते गायब होण्यापूर्वी आपली रक्कम काढावी लागते. जितके जास्त वेळ विमान हवेत राहील, तितका गुणक वाढतो, आणि तितका परतावाही मोठा मिळतो. पण जर विमान गायब होण्याआधी पैसे काढले नाहीत, तर सर्व रक्कम गमवावी लागते. हा गेम मुद्दाम व्यसनाधीन होईल अशा पद्धतीने डिझाइन करण्यात आला आहे, ज्यामुळे अनेकजण झटपट पैसे कमावण्याच्या आशेने याच्या आहारी जातात.

### एव्हिएटर गेमशी संबंधित ही पहिलीच मोठी फसवणूक

प्रकरणाची दखल घेत सायबर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४), ३१९(२) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. पुण्यात एव्हिएटर गेमशी संबंधित ही पहिलीच मोठी फसवणूक असल्याचे सांगण्यात आले.

### व्हॉट्सॲपवर आली गेमसंदभार्तील लिंक

प्रतीक घुगेने दिलेल्या तक्रारीनुसार, २८ नोव्हेंबर २०२४ रोजी त्यांच्या व्हॉट्सॲपवर एक अनोळखी लिंकसह गेमिंग प्लॅटफॉर्मची जाहिरात आली. आकर्षक परताव्याच्या आमिषाने त्यांनी लिंकवर क्लिक करून खाते उघडले. सुरुवातीला त्याने १० हजार रुपये गुंतवले, परंतु कोणताही नफा मिळाला नाही. त्यानंतर आणखी पैसे गुंतवत त्याने एकूण गुंतवणूक वाढवत नेली.

### हळूहळू वाढवत नेली गुंतवणूक

प्रथम गुंतवणुकीनंतर काही अंशी परतावा मिळाल्याने त्याने ५ लाख ८६ हजार रुपये गुंतवले, त्यावर फक्त १ लाख रुपये परत मिळाले. पुन्हा प्रलोभनाच्या नादात, ५ नोव्हेंबर ते ११ डिसेंबर २०२४ दरम्यान त्याने ८ लाख ३० हजार रुपये गुंतवले, यावर फक्त २ लाख रुपये परत मिळाले. तरीही आशेवर पाणी न सोडता त्यांनी १२ ते १९ डिसेंबर या आठवड्यात आणखी १२ लाख ८३ हजार रुपये गुंतवले.अखेर कोणताही परतावा न मिळाल्याने आणि गुंतवलेली रक्कम वाढल्याचे लक्षात आल्यावर, प्रतीकने सायबर पोलिसांकडे धाव घेतली.

## राज्यात २ भीषण अपघात, सात जणांचा मृत्यू... बस अन् ट्रकची समोरासमोर धडक

**■बुलढाणा । प्रतिनिधी :**

राज्यात मंगळवारी दोन भीषण अपघात आले. बुलढाणा जिल्ह्यात बस आणि विटा वाहतूक करणाऱ्या ट्रकचा अपघात झाला. त्या अपघातामध्ये चार जणांचा मृत्यू झाला. तर दुसरा अपघात सांगली झ्र मिरज पंढरपूर कोची फाट्याजवळ झाला. ट्रक टेम्पोच्या भीषण अपघातात तीन महिलांचा मृत्यू झाला. पंढरपूर महामार्गावरील कुची फाटा येथे मागून येणाऱ्या १८ चाकी ट्रकने महिलांनी भरलेल्या टेम्पोला जोराची धडक दिल्याने अपघात झाला. मध्यप्रदेश परिवहन महामंडळाची बस आणि विटा वाहतूक करणाऱ्या वाहनाची आमसरी फाट्याजवळ समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातामध्ये चार जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. खामगाव ते नांदुरा महामार्गावर भीषण अपघात बसमधील १० ते १५ जण जखमी झाल्याची माहिती मिळाली. जखमींना खामगावच्या सामान्य रूग्णालय हलविले आहे. पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून मदतकार्य सुरु केले आहे.

### पंढरपूर महामार्गावरील अपघातात तीन ठार

मिरज तालुक्यातील म्हैशाळ येथील महिला द्राक्षबाग तोडणीसाठी सोलापूर जिल्ह्यातील खेरडी गावांमध्ये गेले होते. ते रात्री परतताना कवठेमंकाळ पंढरपूर महामार्गावरील कुची फाटा येथे मागून येणाऱ्या १८ चाकी ट्रकने महिलांनी भरलेल्या टेम्पोला जोराची धडक दिल्याने भीषण अपघात झाला. यात तीन महिलांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. तर इतर आठ महिला आणि चालक जखमी झाले आहेत. अपघातामध्ये जखमी झालेल्यांवर






मिरज शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृतांमध्ये यात भारती कांबळे, रेखा कांबळे, राणी वडर, या महिलांचा समावेश आहे. अपघातात ट्रकची धडक इतकी जोराची होती की धडकेत टेम्पो पलटी होऊन काही महिला टेम्पोतून बाहेर फेकल्या गेल्याचे गेल्या होत्या. घटनास्थळाहून ट्रक चालकाने पळ काढला आहे. याबाबत कवठेमंकाळ पोलीस ठाण्यात ट्रक चालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत महिला मिरज तालुक्यातील म्हेशाळ या गावातील आहेत. या घटनेने गावावर शोककळा पसरली आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# भाजपची तमिळ अपरिहार्यता

तमिळनाडूमध्ये पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष आणि अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम यांची झालेली युती, हे दोन्ही पक्षांच्या राजकीय अपरिहार्यतेचे निदर्शक आहे. गेल्या वर्षी भाजपची साथ सोडणाऱ्या अण्णा द्रमुकचे प्रमुख ई. पळणीस्वामी यांनी काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची घेतलेली भेट आणि या युतीला विरोध असलेले भाजपचे प्रदेशाध्यक्ष अण्णामलई यांची पदावरून झालेली गच्छंती, यांमुळे दोन्ही पक्ष परस्परांच्या जवळ आल्याचे स्पष्ट झाले होते. त्या पार्श्वभूमीवर शहा यांनी नव्या युतीसह पळणीस्वामी यांच्याच नेतृत्वाखाली निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे. काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रामेश्वरम येथील कार्यक्रमास उपस्थित राहून प्रचाराचा नारळ फोडला होता, त्यापाठोपाठ झालेले राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे फेरसंघटन सत्ताधारी द्रमुकपुढे कसे आव्हान निर्माण करणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. कर्नाटकमध्ये यापूर्वी मिळविलेली सत्ता आणि आंध्र प्रदेशच्या सत्तेतील सहभाग वगळता भाजपला दक्षिणेत फारसा शिरकाव करता आलेला नाही. तमिळनाडू आणि केरळमधील विरोधकांचे बालेकिल्ले अजूनही शाबूत आहेत. तमिळनाडूमध्ये तर गेली अनेक दशके राष्ट्रीय पक्षांना प्रादेशिक पक्षांच्या आधारावरच कसेबसे टिकून राहावे लागत आहे. त्यामध्ये काँग्रेस हा द्रमुकच्या आधारे आपले मर्यादित अस्तित्व टिकवून आहे; तर भाजप आणि अण्णा द्रमुक यांची गेली अडीच दशके युती होती. मात्र, ज्येष्ठ नेत्या जयललिता यांच्या निधनानंतर अण्णा द्रमुकमध्ये पांगापांग झाल्याने निर्माण झालेल्या विरोधकांच्या पोकळीत भाजपनेही राज्यात विस्ताराची पावले टाकली. प्रदेशाध्यक्ष अण्णामलई यांनी राज्यभरात यात्रा काढून आक्रमक प्रचार सुरू केला; मात्र द्रमुकसह अण्णा द्रमुकलाही वेळोवेळी लक्ष्य केल्याने त्या पक्षात नाराजी होती. तसेच 'उत्तरेकडील पक्ष' असा चेहरा असलेल्या भाजपसोबत राहिल्याचा त्यांना फटका बसला आणि लोकसभेच्या काळात ही युती तुटली. दुसरीकडे अण्णामलई यांच्या प्रचारशैलीने भाजप राज्यात चर्चेत आला, मतांच्या टक्केवारीतही वाढ झाली; परंतु निवडणुकीतला विजय दूरच राहिला. त्यामुळेच दोन्ही पक्षांना परस्परांशिवाय पर्याय नसल्याची जाणीव झाली असून नवी युती, हा त्याच वास्तवाचा परिपाक आहे. अण्णा द्रमुक सध्या विस्कळित असला, तरी तेथील द्रविडी राजकारणाचा मोठा घटक आहे. गेल्या निवडणुकीतही त्यांनी मतांची टक्केवारी टिकवून ठेवली होती. त्यामुळे तमिळनाडूमध्ये स्वतंत्र विस्ताराचे स्वप्न लांबणीवर टाकून सध्या तरी अण्णा द्रमुकच्या कुबड्या घेण्याशिवाय पर्याय नसल्याने भाजपने हे बेरजेचे राजकारण केल्याचे दिसते. अण्णा द्रमुकशी युती करण्यास अण्णामलई यांचा विरोध होता, तसेच अण्णा द्रमुकनेही युती करण्यापूर्वी त्यांना हटविण्याची अट घातली होती. त्यापुढे भाजपने नमते घेत अण्णामलई यांना हटवून थेवर समाजातील नेते आणि जयललिता यांचे पूर्वीचे विश्वासू सहकारी नयनार नागेंद्रन यांच्याकडे पक्षाची सूत्रे दिल्याने दोन्ही पक्षांतील संवाद व जागावाटप सुलभ होऊ शकते. याआधी तेलंगणमध्ये संभाव्य मित्र जोडण्याच्या प्रयत्नांत तेथील आक्रमक प्रदेशाध्यक्ष बंडी संजयकुमार यांना दूर करण्याची खेळी भाजपवर उलटली होती. आता तमिळनाडूत तशाच खेळीचा लाभ होणार की तेलंगणची पुनरावृत्ती; हे दोन्ही पक्षांसाठी महत्त्वाचे असेल. पुढील एप्रिल-मे मध्ये होणाऱ्या तमिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी एकापाठोपाठ एक प्रादेशिक अस्मितेचे मुद्दे उपस्थित करून केंद्र सरकारच्या विरोधात आघाडी उघडली आहे. त्यामध्ये वैद्यकीय प्रवेशाच्या 'नीट' परीक्षेचा मुद्दा, त्रिभाषा सूत्राला विरोध करून भाजप हिंदी भाषा लादत असल्याचा आरोप, तसेच मतदारसंघ फेररचनेच्या मुद्द्यावरून दक्षिणेकडील राज्यांचे संघटन असा आक्रमक सूर त्यांनी लावला आहे. तेथील प्रादेशिक राजकारणात या विषयांना विरोध परवडणारा नसल्याने अण्णा द्रमुकसारख्या विरोधकांचीही त्यामुळे कोंडी झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर आता भाजपने द्रमुक नेत्यांचा भ्रष्टाचार, पंतप्रधान मोदी यांनी मांडलेले विकासाचे मुद्दे; तसेच कायदा-सुव्यवस्था अशा खेळपट्टीवर निवडणूक नेण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. सत्ताधारी द्रमुककडे काँग्रेससारखे मित्रपक्ष आणि दलित-मुस्लिम मतांची भक्कम मतपेढी असली, तरी त्याला प्रस्थापितविरोधी जनभावनेला तोंड द्यावे लागेल. त्यातच सुपरस्टार थलपती विजय याच्या तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) या नव्या पक्षाचा नव्याने उदय होत आहे. द्रविड राजकारणाचीच भाषा बोलत असलेला हा पक्ष सत्ताधाऱ्यांच्या मतांमध्ये वाटेकरी ठरू शकतो. अशा वेगवान राजकारणात नव्या युतीमुळे विरोधकांच्या मतांची बेरीज होऊन सत्ताबदल होणार, की भाजपशी संग केल्याचा अण्णा द्रमुकलाही फटका बसणार, हे पाहणे रंगतदार ठरेल.

# मानव केंद्रित शाश्वत तंत्रज्ञानात्मक विकासाला प्राधान्य

डॉ. सतीश श्रीवास्तव- जगातील पहिली औद्योगिक क्रांती (१७६० ते १८४०) ही वाफेच्या इंजिनाच्या शोधामुळे तर दुसरी औद्योगिक क्रांती ही (१८७० ते १९१४) विजेचा शोध व वापर, मोठ्या प्रमाणावरील उत्पादन आणि तांत्रिक प्रगतीमुळे ओळखली जाते. १९६० नंतरचा 'डिजिटल क्रांतीचा' काळ समजला जातो. तिसऱ्या औद्योगिक क्रांतीत संगणक आणि इंटरनेटच्या माध्यमातून स्वयंचलित (ऑटोमेटेड) उत्पादन प्रणाली विकसित झाली. चौथ्या क्रांतीचा '४. एआय' किंवा 'उद्योग.४' असा उल्लेख २०१६ मध्ये जर्मन अर्थतज्ञ क्लॉस श्वाब यांनी केला. या औद्योगिक क्रांतीत कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, रोबोटिक्स यांचा औद्योगिक क्षेत्रात वापर केला जाऊ लागला. उत्पादनाची प्रक्रिया अधिक कार्यक्षम आणि वेगवान करण्यावर यात भर आहे याबरोबरच आभासी प्रतिमांचा उत्पादक कार्यक्षमतेसाठी वापर केला जात आहे. हा संगणक वापराचा पुढचा टप्पा आहे.

युरोपियन कमिशनने जानेवारी २०२१ मध्ये एका श्वेतपत्रिकेत 'इंडस्ट्री.५' हा शब्द पाचव्या औद्योगिक बदलाच्या संदर्भात वापरला तेव्हापासून पाचव्या औद्योगिक क्रांतीच्या चर्चेला उधाण आलेले आहे. खरं पाहता २०११ पासून चौथी औद्योगिक क्रांती आणि २०२१ मध्ये पाचव्या औद्योगिक क्रांतीचा प्रारंभ झाला, असे मानले जात असले तरी २०११ ते २०२५ हा सोळा वर्षांचा कालावधी संगणक, इंटरनेट आणि एआय यांच्याशी जोडला गेलेला आणि प्रचंड तंत्रज्ञानात्मक बदल घडून आणणारा काळ आहे. एआयच्या वापरातून जे मानवी अस्तित्वाचे मूलभूत प्रश्न निर्माण झाले त्यात माणूस आणि मशीन किंवा रोबो यांचे सहसंबंध हा अत्यंत कळीचा मुद्दा चर्चेला आला. म्हणूनच या दोघांच्या सहसंबंधात माणसाचे आयुष्य अधिक प्रगत व सुखी करणाऱ्या प्रयत्नांची आवश्यकता भासू लागली. रोबोटिक्सचा संज्ञानात्मक वापर पाचव्या औद्योगिक क्रांतीत अपेक्षित आहे. अनुभव आणि चुकांमधून शिकून बदलत्या परिस्थितीला अनुकूल असे परिवर्तन करणारे स्पर्धात्मक मशीन तयार करण्यावर पाचव्या औद्योगिक क्रांतीत भर दिला जात आहे. यंत्रमानवांबरोबर माणसांचा संवाद अधिक सुसंवादी, सहज आणि उपयुक्त हवा, जेणेकरून माणसांना 'रिप्लेस' करण्याऐवजी यंत्रमानव माणसांना पूरक ठरेल या दृष्टीने संशोधन करण्याची गरज यात अधोरेखित करण्यात आली आहे, म्हणून पाचवी औद्योगिक क्रांती ही मानव केंद्रित शाश्वत तंत्रज्ञानात्मक विकासाला प्राधान्य देणारी आहे. रोबोट बरोबर आता 'कोबोट' (कॉलॅबोरेटिव्ह रोबोट) यांचा वापर करण्यावर भर दिला जात आहे. कामाच्या ठिकाणी माणसांना /कामगारांना मदत करणारे असे हे कोबोट आहेत. ट्रम्प सरकारच्या टॅरिफ धोरणाचा एआय तसेच आयटी आणि इलेक्ट्रॉनिक उद्योगांच्या पुरवठा साखळीवर अनिष्ट परिणाम होईल हे निश्चित असले तरी अनेक उपाययोजनांचा उदा. पर्यायी तंत्रज्ञान, उत्पादनात बदल, संशोधन इत्यादींचा अनेक राष्ट्रांकडून विचार केला जात आहे. आर्थिक हिताबरोबरच सामाजिक आणि मानवी मूल्यांना तसेच पर्यावरण संरक्षणास अधिक महत्त्व देणे हे पाचव्या औद्योगिक क्रांतीचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

भारत हा जगातील माहिती तंत्रज्ञानामधील एक अव्वल देश असल्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग निर्मित पाचव्या औद्योगिक क्रांतीचा मोठा परिणाम भारतावरही होणार आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (आयएमएफ) अहवालानुसार गेल्या दशकात भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन (जीडीपी) ४.२ लाख कोटी डॉलर आहे. भारताच्या आर्थिक विकासाचा



दरही ६.५ टक्के राहील, असा अंदाज आयएमएफने व्यक्त केला आहे. उत्पादकता, रोजगार, उत्पन्न या सर्वच क्षेत्रांत चौथ्या आणि पाचव्या औद्योगिक क्रांतीचा एकत्रित परिणाम भारतावर दिसणार असल्यामुळे या संदर्भात घडणाऱ्या घटना भारताच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतात.

भारतात सध्या ५२ लाख सॉफ्टवेअर इंजिनीअर्स (आयटी आणि बिझनेस प्रॅक्टिस सर्व्हिसेस) आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि संबंधित विषयाचे अद्ययावत ज्ञान आणि प्रशिक्षण असलेले असे सुमारे दहा लाख आयटी इंजिनीअर्स भारताला येत्या दोन-तीन वर्षांत लागतील. सध्या भारतातील आयटी उद्योग हा २८३ अब्ज डॉलरचा आहे. आणि या मध्ये ५८ लाख व्यक्तींना रोजगार मिळाला आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत आयटी क्षेत्राचा वाटा ७.५ टक्के आहे. भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता उद्योग २०२७ पर्यंत १७ अब्ज डॉलर इतका वाढेल, असा अंदाज आहे. वाढीचा एकत्रित दर हा २५ ते ३५ टक्के वेगाने वाढत आहे. दरवर्षी १५ लाख इंजिनीअर्स भारतात तयार होत असले तरी प्रशिक्षणाच्या अभावामुळे त्यांची रोजगार क्षमता कमी आहे. म्हणून कृत्रिम बुद्धिमत्ता संचलित उद्योगांना आयटी प्रशिक्षित इंजिनीअर्सचा तुटवडा भासत आहे. एआयच्या क्षेत्रात २०२७ पर्यंत २३ लाख रोजगार निर्माण होऊ शकतात. नॅसकॉमच्या (नॅशनल असोशिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्विसेस कंपनीज) अंदाजानुसार इंजिनीअर्सची मागणी मोठ्या प्रमाणात वाढू शकते, परंतु, या क्षेत्रात प्रशिक्षित आयटी इंजिनिअर्सचा उद्योग क्षेत्राला तुटवडा भासू शकतो. म्हणूनच सध्याच्या आयटी इंजिनीअर्सना पुर्नकौशल्ये (रीस्किलिंग) तर नवोदित आयटी इंजीनिअर्सना उच्च कौशल्ये (अपस्किलिंग) शिकविण्यावर भारताने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. नॅसकॉमच्या 'इंडिया इंडस्ट्री ४ अडॉप्शन' या अहवालानुसार २०२५ पर्यंत भारतातील उद्योगधंद्यांच्या एकूण उत्पादन खर्चापैकी ४० टक्के खर्च हा डिजिटल तंत्रज्ञानाशी निगडित असेल.

२०२९ पर्यंत भारतातील स्वयंचलित उत्पादन तंत्र (ऑटोमेशन टेक्नॉलॉजी) व्यवसायाची वाढ २९.४३ दशलक्ष डॉलरपर्यंत वाढेल, असा अंदाज आहे. तसेच रोबोटिक्स मार्केट क्षेत्र २०२५ मध्ये ५५ अब्ज डॉलरपर्यंत आहे. यात २०३० पर्यंत दर वर्षी १८ टक्क्यांनी वाढ होईल असा अंदाज आहे. यामुळे लवकरच भारतात अनेक ठिकाणी 'स्मार्ट फॅक्टरीज' दिसू लागतील, या आश्चर्य नाही. आंतरराष्ट्रीय व्यापार हा जास्तीत जास्त संरक्षित होण्याकडे वाटचाल करीत असताना निर्यात वाढीचेही भारतासमोर आव्हान आहे. यासाठी एमएसएमई उद्योगांना एआय आणि मशीन लर्निंगच्या माध्यमातून स्मार्ट फॅक्टरीज बनविणे आणि त्यांची स्पर्धात्मकता वाढविणे, तंत्रज्ञांचे प्रशिक्षण. मूलभूत सुविधा पुरविणे, संशोधनास चालना देणे, विदा (डेटा) निर्मिती आणि त्याचे संरक्षण. एआय आणि रोबोटिक्स संदर्भातील नैतिक मूल्ये इत्यादी जबाबदाऱ्या हाताळण्याचे कौशल्य भारतातील धोरणकर्त्यांना दर्शवावे लागेल. उद्योगधंद्यात सुरुवातीला नमुना किंवा छोटा पथदर्शी प्रकल्प राबवून त्याच्या शक्यता आणि यशापयश पाहून क्रमाक्रमाने यंत्रमानव आणि एआय टूल्स चा वापर करावा लागेल. तसेच उत्पादन संस्था. कर्मचारी आणि संबंधित ग्राहक यांच्या गोपनीय माहितीच्या सुरक्षेला (कॉन्फिडेन्शियल कॉम्प्युटिंग)म्हणजेच विदा सुरक्षा आणि संरक्षण महत्त्वाचे राहील. नवतंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याबरोबरच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्याची गरज उत्पादन संस्थांना भासेल.

चौथ्या औद्योगिक क्रांतीची नुकतीच सुरुवात झाली असताना पाचव्या औद्योगिक क्रांतीचे पडघम वाजू लागले, ही गोष्ट आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अफाट वेगाची प्रचिती देणारी आहे. जगाच्या या गतीबरोबर आपली पाऊले जुळतात, वळतात की मागे पडतात, हे आपल्या सर्वसमावेशक आणि विज्ञानाधिष्ठ दृष्टिकोनावर अवलंबून आहे.

# खटासी असावे खट



बांगलादेशला निर्यातीसाठी भारतीय प्रदेश वापरण्याची दिलेली मुभा काढून घेणारा आदेश केंद्र सरकारने जारी केला आहे. 'खटासी असावे खट' या उक्तीला धरूनच भारताचा हा निर्णय असून, भारतातील अनेक उद्योजक आता त्यासाठी केंद्र सरकारचे आभार मानत आहेत. वास्तविक, भारताने केलेल्या अमूल्य मदतीमुळेच जन्माला आलेला बांगलादेश ती कृतज्ञता केव्हाच विसरला आहे. बांगलादेशचे झपाट्याने मूलतत्त्ववादीकरण आणि इस्लामीकरण करण्याचे प्रयत्न जारी आहेत. नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ महंमद युनूस यांच्याकडे त्या देशाची धुरा आहे. हे युनूस अर्थतज्ज्ञ असले, तरी त्यांना राजकीय शहाणपण अजिबात नसावे, असे ते वारंवार सिद्ध करत आहेत. भारताच्या आजूबाजूला असलेल्या सर्व देशांना अंकित करण्याचा चीनचा सतत प्रयत्न सुरू असतो. हे युनूस त्याला सहजी बळी पडले आहे, असेच म्हणायला पाहिजे. त्यामुळेच चीनमध्ये जाऊन 'ईशान्य भारतासाठी आम्हीच समुद्राचे रक्षणकर्ते आहोत,' अशी दर्पोक्ती त्यांनी केली. वर चीनला त्यांची बंदरे वापरून निर्यात करण्याची खुली मुभाही देऊन टाकली. वस्त्रप्रावरणांच्या व्यवसायात भारताला सर्वांत मोठी स्पर्धा बांगलादेशकडूनच आहे. असे असतानाही केवळ मैत्रीपोटी भारताने बांगलादेशला आपल्या भूमीचा वापर त्यांच्या निर्यातीसाठी करण्याची परवानगी २०२० मध्ये दिली होती. त्यामुळे त्या देशाला नेपाळ, म्यानमार, भूतान आदी देशांना निर्यात करणे सुलभ झाले होते. मात्र, युनूस यांनी चीनमध्ये जाऊन भारतविरोधी तारे तोडल्यावर भारताने अगदी योग्य निर्णय घेऊन, त्या देशाची व्यापारकोंडी केली आहे. वास्तविक, बांगलादेश किती तरी गोष्टींबाबत भारतावरून अवलंबून आहे.

# यूपीआय सिस्टिम अधिक सक्षम करण्याची गरज!

जगातील सर्वात आधुनिक तसंच विश्वासार्ह मानली जाणारी भारताची युनिफाईड पेमेंट सिस्टिम (यूपीआय) तीन दिवसांपूर्वी क्रॅश होताच टेकविश्वात मोठी खळबळ उडाली. देशातील कोट्यवधी यूपीआय यूजर्स काही तासांकरिता का होईना, परंतु एकाएकी कफ्फलक बनले. बँक खात्यात काही हजार किंवा लाख रुपये शिल्लक असूनही त्यांना एक रुपयाचाही आर्थिक व्यवहार करता आला नाही. परिणामी कोट्यवधी रुपयांचे आर्थिक व्यवहार खोळंबले.

काळाच्या ओघात डिजिटल पेमेंट सिस्टिमने भारतीय अर्थव्यवस्थेत किती मजबूत पकड घेतलीय, याचं हे उत्तम उदाहरण म्हणावं लागेल. आजच्या घडीला यूपीआय ही भारताच्या डिजिटल पेमेंट सिस्टिमचा कणा बनलीय. ही जगातील सर्वात विश्वासार्ह आणि वेगवान डिजिटल पेमेंट सिस्टिम मानली जाते. यूपीआय व्यवहारांवर विसंबून असणाऱ्या कोट्यवधी भारतीयांनी आपल्या खिशात रोख रक्कम ठेवणं जवळपास बंदच केलं आहे. त्याचाच फटका त्यांना यूपीआय सिस्टिम क्रॅश झाल्यामुळं बसला.

स्मार्टफोन-इंटरनेट यूजर्सच्या वाढत्या संख्येसोबत देशात डिजिटल पेमेंटची संख्याही वेगानं वाढलीय. परंतु, डिजिटल पेमेंटवरील वाढत्या अवलंबित्वासह वारंवार तांत्रिक समस्यादेखील समोर येत आहेत. तीन दिवसांपूर्वी पुन्हा एकदा गुगल पे, फोन पे, पेटीएम आदी यूपीआय प्लॅटफॉर्म वापरणाऱ्या लाखो यूजर्सनी पेमेंट-फंड ट्रान्सफर फेल होत असल्याच्या असंख्य तक्रारी नोंदवल्या.

कारण शनिवार १२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजेपासून देशभरात ३ ते ४ तासांसाठी यूपीआय सर्विस विस्कळीत झाली होती. केवळ शनिवारीच नाही, तर त्याआधी २ एप्रिल २०२५ रोजी आर्थिक वर्षाच्या क्लोजिंगमुळं अनेक बँकांची यूपीआय सर्विस बंद होती किंवा अत्यंत धिम्या गतीनं सुरू होती. एकट्या एसबीआयशी संबंधित ५ हजाराहून अधिक तक्रारी नोंदवण्यात आल्या होत्या. २६ मार्च २०२५ रोजीही यूपीआयची सर्विस ३ पेक्षा अधिक तासांकरिता ठप्प झाली होती. म्हणजेच ही विश्वासार्ह सिस्टिम गेल्या १५ दिवसांत अचानक ३ वेळा क्रॅश झालीय.

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) कडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, मार्च २०२० पासून २०२५ पर्यंत म्हणजेच मागील २५ वर्षांत यूपीआयची सर्विस तब्बल १७ वेळा ठप्प झालीय. या दरम्यान सुमारे १ हजार मिनिटं कुठलेही आर्थिक व्यवहार झालेले नाहीत. यामुळे भारतीय यूपीआय सर्विस धोक्यात आहे का? तांत्रिक पायाभूत सुविधांमध्ये काही कमतरता आहेत का? असे अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागलेत.

यूपीआय ही तात्काळ पेमेंट सेवा अर्थात आयएमपीएसच्या (इमिजिएट पेमेंट सर्विस) पायाभूत सुविधांवर आधारित सर्विस आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशनने ही डिजिटल पेमेंट सर्विस विकसित केलीय. एनपीसीआयअंतर्गत चालणारी ही भारतातील सर्वात जलद आणि सोपी पेमेंट सिस्टिम आहे. यूपीआयच्या माध्यमातून यूजर्स कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय कधीही आणि कुठेही त्वरित पैसे हस्तांतरित करू शकतात.

लहान-मोठ्या दुकानांमध्ये स्मार्टफोननं क्यूआर कोड स्कॅन करून, बँक खात्याला फोन क्रमांक लिंक असल्यानं बिल पेमेंट, मोबाईल टू मोबाईल, मोबाईल टू बँक फंड ट्रान्सफर आदी अत्यंत सहजरित्या करता येतं. यूपीआयद्वारे बँकेचा खाते क्रमांक किंवा आयएफएससी कोड माहीत नसतानाही फक्त यूपीआय आयडी किंवा क्यूआर कोड वापरून पेमेंट करता येतं.

यूपीआय सिस्टिम डिजिटली दोन बँकांना जोडून अवघ्या २-३ सेकंदात आर्थिक व्यवहार पूर्ण करते. म्हणूनच कोट्यवधी भारतीय यूजर्स अगदी भाजी विक्रेत्याचे पैसे देण्यासाठीही यूपीआयचा वापर करताना दिसतात. यूपीआय क्रॅश झालं की ऑफिसमधून रिक्षा-टॅक्सीनं घरी कसं जायचं याची चिंता अनेकांना सतावते. दूध, ब्रेड विकत घेण्याचीही अनेकांची पंचाईत होते, कारण अनेकांच्या पाकिटात तर रोख रुपये नसतात आणि बँक बॅलन्स चेक करण्याचीही सोय नसते. आज कोणतीही वस्तू




> स्मार्टफोन-इंटरनेट यूजर्सच्या वाढत्या संख्येसोबत देशात डिजिटल पेमेंटची संख्याही वेगानं वाढलीय. परंतु, डिजिटल पेमेंटवरील वाढत्या अवलंबित्वासह वारंवार तांत्रिक समस्यादेखील समोर येत आहेत. तीन दिवसांपूर्वी पुन्हा एकदा गुगल पे, फोन पे, पेटीएम आदी यूपीआय प्लॅटफॉर्म वापरणाऱ्या लाखो यूजर्सनी पैसे ट्रान्सफर होत नसल्याच्या असंख्य तक्रारी नोंदवल्या. यूपीआयनं भारताला डिजिटल पेमेंटमध्ये जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिली आहे, परंतु सततच्या तांत्रिक समस्यांमुळं हेदेखील सूचित होतं की ही डिजिटल पेमेंट सिस्टिम आणखी सक्षम करण्याची आवश्यकता आहे.

फक्त एका क्लिकवर सहज खरेदी करता येते. पण त्यातही विशेषतः तरुण आणि मध्यमवयीन यूजर्समध्ये यूपीआय पेमेंटचा ट्रेंड सर्वात जास्त आहे. वयस्क लोक यूपीआय पूर्वी क्वचितच वापरत. पाकिटात रोख रक्कम ठेवण्यावर त्यांचा जास्त विश्वास असायचा. परंतु हळूहळू परिस्थिती बदलत चाललीय. वयस्कांनाही यूपीआय सर्विस पाकिटात पैसे ठेवण्याच्या तुलनेत कमी जोखमेची वाटू लागलीय.

एक सर्वसामान्य यूपीआय यूजर दररोज १ लाख रुपयांपर्यंत आर्थिक व्यवहार करू शकतो. परंतु, भांडवली बाजार, विमा, कर संकलन आणि परकीय आवक रेमिटन्स यासारख्या आर्थिक व्यवहारांकरिता यूपीआय यूजरला २ लाखांपर्यंतचे आर्थिक व्यवहार करता येतात. आयपीओ, शिक्षण, आरोग्य सेवा आणि आरबीआय रिटेल डायरेक्ट योजनांसाठी हीच मर्यादा ५ लाखांपर्यंत असू शकते.

यूपीआय प्लॅटफॉर्म वापरालाही काही मर्यादा असतात. एखादा यूजर दिवसभरात यूपीआय प्लॅटफॉर्मवरुन दिवसभरात २० व्यवहारच करू शकतो. बँकांच्याही स्वतःच्या लिमिट्स असतात. ज्या प्रतिदिन २५ हजार ते १ लाख रुपयांपर्यंत असतात. काही बँकांमध्ये दैनंदिन मर्यादेऐवजी साप्ताहिक किंवा मासिक मर्यादादेखील असतात.

यूपीआय यूजर्सची संख्या प्रचंड झपाट्यानं वाढतेय. देशात दररोज सरासरी ६० कोटी तर दर तासाला २.५ कोटींहून अधिक यूपीआय व्यवहार होतात. ज्यांचं एकूण मूल्य सुमारे ८० हजार कोटी रुपये इतकं आहे. मार्च २०२५ मध्ये दररोज सरासरी ५९ कोटी यूपीआय व्यवहार झाले. या संपूर्ण महिन्यातील यूपीआय व्यवहारांचं एकूण मूल्य २४.७७ लाख कोटी रुपयांवर पोहोचलं होतं. फेब्रुवारीच्या तुलनेत हा आकडा १२.७ टक्क्यांहून जास्त होता. फेब्रुवारीमध्ये यूपीआयच्या माध्यमातून २१.९६ लाख कोटी रुपयांचे व्यवहार झाले होते.

भारतीय यूपीआयची भुरळ फ्रान्सचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष इमॅन्युल मॅक्रॉन यांनाही पडली होती. ते जेव्हा भारताच्या दौऱ्यावर आले होते, तेव्हा त्यांनी एका चहाच्या टपरीवर चहा पिऊन यूपीआय पेमेंट केलं होतं. इमॅन्युल मॅक्रॉन एवढ्यावरच थांबले नाही, तर त्यांनी फ्रान्समध्येही भारताची यूपीआय सर्विस सुरू केली. सद्यस्थितीत भूतान, यूएई, कतार आणि फ्रान्समध्ये यूपीआयची सर्विस सुरू आहे. जपान आणि ब्रिटनसारखे देशही यूपीआय सुरू करण्याच्या तयारीत आहेत.

यावरून स्पष्ट दिसतंय की, आज भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा बनलेली यूपीआय सर्विस भविष्यात जागतिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. परंतु सर्व्हर डाऊन किंवा सिस्टिम क्रॅश होणे यांसारख्या वारंवार होणाऱ्या घटनांमुळे यूपीआय यूजर्सचा आत्मविश्वास डळमळीत होत आहे. शिवाय त्याचा दैनंदिन आर्थिक व्यवहारांवरही गंभीर परिणाम होत आहे. १२ एप्रिल रोजी झालेल्या समस्येसाठी एनपीसीआयने तांत्रिक समस्येला दोष दिला होता.

सध्या देशात आयपीएलचा हंगाम सुरू आहे. यावेळी क्रिकेट मॅचदरम्यान गेमिंग ॲप्समधील आर्थिक व्यवहारांची संख्या वाढते, परिणामी सर्व्हरवर भार वाढत असल्याचंही म्हटलं जातं. कधी कधी इंटरनॅशनल यूपीआय व्यवहारांकरिता एनपीसीआय बॅकएंडमध्ये बदल करत असल्याचा परिणाम देशांतर्गत व्यवहारांवरही दिसून येतो. तर बऱ्याचदा समस्या एनपीसीआयच्या सर्व्हरमध्ये नसून बँकांच्या स्वतःच्याच सर्व्हरमध्ये असते.

एसबीआय, एचडीएफसीसारख्या बँकांकडून देखभालीच्या कारणास्तव सिस्टिम बंद किंवा धिम्या गतीनं सुरू असल्याचं कारण दिलं जातं. जेव्हा जेव्हा यूपीआय सिस्टिम ठप्प होते, तेव्हा तेव्हा देशभरातील यूपीआयद्वारे होणाऱ्या आर्थिक व्यवहारात अंदाजे ५ ते १० टक्क्यांपर्यंतची घट होते. आर्थिक व्यवहार घटण्यापेक्षा यूपीआय यूजर्सचे आर्थिक व्यवहार रखडतात. ज्या कारणांसाठी आज देशभरातील कोट्यवधी यूजर्स यूपीआयचा बिनधास्त वापर करतात त्या उद्देशालाच हरताळ फासला जातो.

यूपीआयनं भारताला डिजिटल पेमेंटमध्ये जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिली आहे, परंतु सततच्या तांत्रिक समस्यांमुळं हेदेखील सूचित होतं की ही डिजिटल पेमेंट सिस्टिम आणखी मजबूत करण्याची आवश्यकता आहे. एनपीसीआय आणि आरबीआयने वेळेत या तांत्रिक समस्या सोडवल्या नाहीत तर देशातील सर्वात जलद आणि सोप्या पेमेंट सिस्टिमच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ शकतं.



# अनेकांच्या तोंडचे पाणी पळाले

मुंबईत गेले चार दिवस सुरू असलेला पाण्याच्या टँकरचा संप सोमवारी मागे घेण्यात आला, मात्र यानिमित्ताने पाण्याच्या बाबतीत इतर शहरांच्या तुलनेत सुखी असलेली मुंबापुरीही टँकरच्या दावणीला किती बांधलेली असते, हे अधोरेखित झाले. मुंबईतील विहिरी, विंधणविहिरी, कूपनलिका यांची संख्या साधारण साडेअकरा हजार असून त्यातून पाणीउपसा करून टँकरद्वारे या पाण्याची विक्री होत असते.

असा पाणीउपसा करण्यापूर्वी केंद्रीय भूजल प्राधिकरणाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळवावे लागेल, असे निर्देश मुंबई महापालिकेने जारी केले होते. त्यास मुंबई टँकर असोसिएशनने विरोध करत संपाचे हत्यार उपसले. टँकरवाले संपावर गेल्यावर मुंबई विद्यापीठाचे वसतिगृह, काही सोसायट्या, पंचतारांकित हॉटेल्स, व्यापारी आस्थापना, त्याचप्रमाणे इतर अनेक उद्योग-व्यवसायांच्या तोंडचे पाणी पळाले. मुंबईत दिवसाला सुमारे ३९०० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा सात तलावांमधून १०० किलोमीटर अंतरावरून होतो.

त्यापूर्वी या पाण्याचे शुद्धीकरण केले जाते. मात्र, पाणी घरात येईपर्यंच्या मार्गामध्ये ३० टक्के पाणी वाया जाते. मुंबईतील काही भूभाग उंचावर आहेत, तिथे पाणी चढत नाही. याव्यतिरिक्त मुंबईतील व्यापारी वापरातील पाण्याची तहानही मोठी आहे. मेट्रो रेल्वे, बुलेट ट्रेन, रस्त्यांचे काँक्रिटीकरण आणि मुंबईभर सुरू असलेली असंख्य बांधकामे यांना वारेमाप पाणी लागते. ही सर्व गरज टँकरमधील पाण्याद्वारेच भरून निघते. रोगराईच्या कारणांमुळे मुंबईतील विहिरी कित्येक वर्षांपूर्वी बंद करण्यात आल्या. मात्र त्या विहिरींमधील पाण्याचा उपसा करून त्यावर टँकरचा धंदाही आता कित्येक वर्षे तेजीत आहे. पाण्याचे व भूजलस्त्रोतांचे योग्य व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने केंद्रीय भूजल प्राधिकरणाची परवानगी सक्तीची केल्यावर टँकरवाल्यांनी अडवणूक सुरू केली.

अखेर आपत्कालीन कायद्याचा वापर करण्याचे सूतोवाच मुंबई महापालिकेने करताच टँकरवाल्यांनी माघार घेतली. काही वर्षांपूर्वी वसई-विरार पट्ट्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या दुर्भिक्षामुळे टँकर लॉबीने वर्चस्व निर्माण केले होते. दक्षिण मुंबईतही वषार्नुवर्षे अग्निशमनाच्या हायड्रंट पाइपमधून पाणी भरून ते विकण्याचा धंदाही तेजीत होता. कित्येक वसाहतींनाही आज टँकरवर अवलंबून राहावे लागते, ही स्थिती योग्य नाही. जलजन्य आजारांचा धोका वाढता आहे आणि भूजलाचे स्त्रोतही आटत आहेत, या पार्श्वभूमीवर भूजलासंबंधीचे नियमपालन आवश्यक ठरते. सर्वांसाठी पाणी हे ब्रीद आजही दूरच आहे व टोलेजंग टॉवरनी आकाश व्यापणाऱ्या मुंबईपुढे पाण्याचे किती मोठे आव्हान आहे, हेही यातून दिसून आले.



## कैरी-दुधीचा मुरांबा

**साहित्य:** दुधी भोपळ्याचा कीस ३ वाट्या, कैरीचा कीस १/२ वाटी, साखर ३-१/२ वाट्या, वेलची पूड २ चमचे, केशरकाड्या १/२ चमचा.

**कृती:** प्रथम दुधी भोपळा व कैरी वेगवेगळे किसून घेऊन नंतर एकत्र करणे व त्यात साखर घालून १० मिनिटे तसेच ठेवणे, साखर हळूहळू विरघळू लागेल नंतर गॅसवर ठेवून उकळणे. साधारण एकतारी झाला असे वाटले की गॅस बंद करून त्यात केशर व वेलची पूड एकत्र करून थंड झाल्यावर बाटलीत भरणे. पारदर्शक असा हा मुरांबा दुधी भोपळा प्रकृतीने थंड असल्यामुळे उन्हाळ्यात अतिशय उत्तम.


# हेअर कलर करा पण सांभाळून...

आजकाल मुली असो वा स्त्रिया हेअर कलर करण्याचं क्रेझ वाढलं आहे. सध्या लेटेस्ट रंग वापरून आपल्या पर्सनालिटीला एक वेगळा लुक देता येतो. अलीकडे ब्राऊन, चॉकलेट, बरगंडी आणि ब्लैंड फॅशनमध्ये आहे. त्यातून हायलायटिंगचा ट्रेंड आहे. मात्र केसांना कलर देण्यापूर्वी त्यांचा प्रकार समजून घेणं गरजेचं आहे.

### कलर करण्यापूर्वी हे करा

- कलर करण्यापूर्वी हेअर कटिंग किंवा ट्रिमिंग करून घ्या.
- कलरिंगसाठी दिलेल्या निर्देशांक पुस्तिकेत सांगितल्याप्रमाणे हेअर कलर करण्यापूर्वी ॲलर्जी टेस्ट करून घ्या.
- कलर वापरण्यापूर्वी दिलेल्या सूचना नीट वाचून घ्या.
- आपल्या केसांवर पूर्वी कधीच रंगांचा वापर केलेला नाही की ते आधीपासूनच रंगलेले आहेत. जे जाणून घेतल्यानंतर योग्य रंगाची निवड करा.
- कलर निवडण्यापूर्वी काही शंका असेल तर हेअर एक्सपर्टचा सल्ला घ्या.
- कलर करण्यापूर्वी एकाच आकाराचे फॉइल तयार ठेवा.
- अता व्ही शेपमध्ये केस घेऊन त्याचे पातळ सेक्शन करून घ्या. त्याखाली फॉइल ठेवून केसांना कलर करा आणि दोन्ही बाजूने दुमडून फोल्ड करा. हायलाइट एकासारखं असावं हे लक्षात असू द्या.
- कलर झाल्यावर अर्ध्या तासाने फॉइल काढा आणि केस धुऊन शेपू करा. केस वाळल्यावर





वेगळाच लुक येईल.

### हे करू नका

- कलर करताना केसांच्या मुळांना कलर लावू नका.
- वयाने जास्त असलेल्या स्त्रियांनी डार्क रंगाचा वापर करू नये.
- ओल्या केसांमध्ये कलर करू नये याने कलर स्कल्पवर पसरतो.
- कलर केलेले केस कधीच गरम पाण्याने धुऊ नये. याने कलर फिकट होऊ लागतो.
- दुर्सयांचं पाहून रंगाची निवड करू नये. आपल्याला जो शोभेल तोच कलर वापरा.

**चॉकलेट कोणाला आवडत नाही? लहानापांसून थोरामोठ्यांपर्यंत चॉकलेट आवडीने खातात. मात्र दातांवर परिणाम होऊ नये यासाठी काहीजण चॉकलेट खात नाहीत. मात्र तुम्हाला माहीत आहे का चॉकलेट खाण्याचेही अनेक आश्चर्यकारक फायदेही आहेत.**

# चॉकलेट खाण्याचे हे आहेत फायदे

**तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर**

– तणाव कमी करण्यासाठी चॉकलेट अधिक फायदेशीर आहे. डार्क चॉकलेट खाण्याने तणाव कमी होतो. उच्च रक्तदाबाचा त्रास कमी करण्यासाठी चॉकलेटचे सेवन परिणामकारक ठरते. कोकोमध्ये असलेले अँटीऑक्सिडंटस स्वास्थ चांगले राखण्यासाठी मदतशीर ठरतात. हृदयासाठीही चॉकलेट फायदेशीर आहे. चॉकलेटच्या सेवनाने हृदयरोगाची शक्यता कमी होते. चॉकलेट खाण्याने व्यक्तीचा मूड सुधारतो. कोकोच्या सेवनाने थकवा कमी होण्यास मदत होते.

**वजन घटवण्यात गुणकारी**

– ॅलिफोर्नियाच्या सॅन डिगो विद्यापीठात करण्यात आलेल्या संशोधनानुसार नियमितपणे चॉकलेट खाल्ल्याने वजन कमी होण्यात मदत होते. वैज्ञानिकांनुसार चॉकलेटमधील कोको फ्लॅवनॉल वाढत्या वयासंबंधित आजारांना दूर ठेवते. अमेरिकेच्या संशोधनानुसार, रोज हॉट चॉकलेटचे दोन कप सेवन केल्यास मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. तसेच स्मरणशक्तीही वाढते.



# प्रेग्नन्सी दरम्यान कारल्याचे सेवन करावे की करु नये, दूर करा कन्फ्यूजन

गर्भावस्थेत स्त्रिया आपल्या खाण्यापिण्याबद्दल फारच कॉन्शियस होऊन जातात. काय खायला पाहिजे काय नाही, या बद्दल बऱ्याच गर्भवती स्त्रियांना योग्य माहिती नसते. बऱ्याच महिला गर्भावस्थेत कारले खायला पाहिजे की नाही याबद्दल भ्रमित असतात. तर त्यांचे कंफ्यूजन आपण दूर करू. गर्भावस्थेदरम्यान कारल्याचे सेवन आई आणि बाळ दोघांच्या आरोग्यासाठी एक उत्तम विकल्प साबीत होऊ शकते. कारल्यात फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम, बीटा-केरोटिन आणि आयट्री फायबर असत जे गर्भात वाढणारे बाळ आणि आई दोघांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असत.



**फायबरचे प्रमाण जास्त असतात :** कारल्यात फायबर उच्च मात्रेत असत ज्यामुळे भूक लवकर लागत नाही. हे हाय कॅलोरी फूड्स आणि जंक फूड्सच्या क्रेविंग्सला कमी करतो. त्याशिवाय हे प्रेग्नेंसीदरम्यान तुम्हाला लठ्ठ होण्यापासून देखील तुमचा बचाव करतो.

**टीऑक्सीडेंट असतो :** कारल्यात व्हिटॅमिन सी असत, जे एंटीऑक्सीडेंट असून गर्भवती महिलांना हानिकारक बॅक्टेरियापासून लढण्याची शक्ती देत. हे गर्भवती महिलांच्या रोगप्रतिकारकला देखील वाढवण्यास मदत करतो आणि रोगप्रतिकारक सिस्टमला बूस्ट करतो.

**बॉवेल मुव्हमेंटला योग्य ठेवतो :** कारले पेरिस्टालिसिसला बूस्ट देण्यास देखील मदत करतो जे नंतर बॉवेल हालचालला नियंत्रित करणे आणि गर्भवती महिलांच्या पचन तंत्राला योग्य करण्यात मदत करतो. कारले पचन तंत्राशी निगडित इतर समस्यांमध्ये देखील आराम देण्यास मदत करतो.

**फोलेट उच्च प्रमाणात असतो :** गर्भवती महिलांसाठी फोलेटची आवश्यकता असते. हे मिनरल्स संभावित न्यूरल ट्यूब डिफेक्टला सुरक्षित ठेवण्यास मदत करतो. कारल्यात फोलेटची मात्रा फार जास्त असते. यामुळे गर्भवती महिलांमध्ये या मिनरल्सच्या दैनिक आवश्यकतेचे एक चतुर्थांश भाग आहे.

**अभ्रकाचा विकास करतो :** कारल्यात काही खास प्रकारचे व्हिटॅमिन्स आणि मिनिरल्सचा एक मोठा स्रोत असतो. यात आयरन, नियासिन, पोटॅशियम, पेंटोथेनिक ॲसिड, जिंक, पाइरोडॉक्सिन, मॅग्नीशियम आणि मँगनीज सामील आहे. याला म्हणून आपण सुपर भाजी म्हणू शकतो कारण हे भ्रूणच्या विकासात एक महत्त्वाची भूमिका बजावतो.

# फोन 'स्वस्त' पण फोटो येतील 'मस्त', फक्त 'या' सोप्या टीप्स करा फॉलो !

तुमच्याकडे कोणत्याही प्रकारचा स्मार्टफोन असेल भलेही स्वस्त किंमतीचाही असेल पण तरीही जर तुम्हाला फोटोग्राफीच्या खास ट्रीक्स माहित असतील तर तुमच्या फोनमधील फोटो अगदी बेस्टच येतील. आजकाल डिजीटल कॅमेरा फार कमी लोक वापरतात. प्रोफेशनल लोक सोडले तर इतर सर्वजण मोबाईल फोनच्या कॅमेऱ्यानेच सर्व फोटोग्राफी करतात. पूर्वी घरातील फंक्शन्स किंवा पिकनिकला कॅमेरा वापरला जायचा पण आजकाल सर्वत्र मोबाईल फोनच्या कॅमेऱ्यानेच काम होतं, पण त्यामुळे फोनमधून फोटोही तसेच यावे असं वाटत असतं. पण अनेकांकडे बजेटच्या इश्यूमुळे स्वस्तातले फोन असतात, त्यांना वाटतं की फोन स्वस्त असल्यामुळे फोटो चांगले येणार नाहीत. पण मूळात तुमच्याकडे १०-२० हजारांचा फोन असेल तरी तुम्ही भारी फोटो काढू शकता, त्यासाठी सोप्या काही टीप्स तुम्हाला फॉलो कराव्या लागतील... त्याच टीप्सबद्दल जाणून घेऊ...



फ्रेमः तुम्ही कोणत्याही वस्तूचा किंवा व्यक्तीचा फोटो घेत असाल तर तो पूर्णपणे फ्रेममध्ये ठेवा. म्हणजेच, वस्तू फ्रेममध्ये योग्यरित्या आली पाहिजे, कॅमेरा ते ऑब्जेक्टपर्यंतचं अंतरही नेमकं हवं. प्रकाशः चांगला फोटो काढण्यासाठी तुम्हाला योग्य लाईट म्हणजेच प्रकाशाची काळजी घेणंही आवश्यक आहे. योग्य लाईट नसेल तर फोटो डार्क येऊ शकतो,तसंच अतिप्रकाशातही फोटो बरोबर येणार नाही योग्य लाईट फार महत्त्वाची असते.

दोन्ही हातांचा करा वापरः चांगला फोटो काढण्यासाठी नेहमी दोन हात वापरा जेणेकरून तुमची फोनवरील पकड चांगली होईल आणि तुम्ही ऑब्जेक्ट आरामात कॅप्चर करू शकता.

झूमः फोटो घेण्यासाठी झूम या फीचरचा जपून वापर करा. आवश्यक असल्यासच कॅमेरा झूम करा किंवा फिजीकली तुम्ही फोटो काढणाऱ्या व्यक्ती किंवा गोष्टीच्या जवळ जा, ज्यामुळे फोटो फाटणार नाही.

तसेच स्मार्टफोनमध्ये उपलब्ध असलेले वेगवेगळे मोड वापरुनही तुम्ही आपोआप फोटो अधिक चांगले काढू शकता. आजकाल मोबाईल फोनमध्ये पोर्ट्रेट, नाईट, प्रो आणि स्लो-मो असे अनेक पर्याय आहेत, ज्याच्या मदतीने तुम्ही चांगले फोटो काढू शकता.

# जवस रोजच्या जीवनात फायदेशीर

**जवसचा** वापर रोजच्या आहारात करणे महत्त्वाचे आहे. भाकरीबरोबर जवस किंवा अळशीची चटणी हा मेनू खास ग्रामीण असला तरी जवसाचं महत्त्व सगळ्यांना कळायला लागलं आहे. जवसच्या नियमीत सेवनाने रक्तातील साखर, ट्रायग्लिसराईड्स, हिमोग्लोबिन आणि कोलेस्टेरॉल आटोक्यात राहू शकतात. स्त्रियांच्या बाबतीत हॉर्मोन्सची पातळी योग्य ठेवण्यासाठी जवसाचा उपयोग होतो.

- हिरड्या मजबूत करण्यासाठी आणि दात दुखत असल्यास त्यावर जवसचे तेल फायदेशीर ठरते.
- जवसाचं पीठ घेऊन त्याने छाती शेकली तर कफ पातळ होऊन तो बाहेर पडण्यास मदत होते. यामुळे तापाचे प्रमाण देखील कमी होईल.
- पाठ दुखत असेल तर दुखणाऱ्या जागी जवस बांधून ठेवावे.
- एखाद्या ठिकाणी भाजलं असेल तर त्या ठिकाणी जवसचं तेल आणि चुन्याची निवळी एकत्र करुन बांधावी. यामुळे जखम लवकर बरी होते.



आहारात जवसाचा वापर केल्यास भूक वाढते आणि पचनक्रिया देखील चांगली राहते.

## रोज एक टोमॅटो खाल्ल्याने होतात अनेक फायदे



सॅलडमध्ये तसेच भाज्यांमध्ये टोमॅटोचा वापर केला जातो. मात्र तुम्हाला माहीत आहेत का रोज टोमॅटो खाण्याचे फायदे. ज्या आजारांवरील इलाज कठीण आहे, त्यावरही टोमॅटो गुणकारी आहे.

- हृदयासंबंधित रोगांपासून बचाव होतो.
- युरिन इन्फेक्शनपासून बचाव तसेच रक्तशुद्धी होते.
- पचनशक्ती वाढते. पालकाच्या रसात टोमॅटोचा रस मिसळल्याने बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.
- टोमॅटोमध्ये असलेल्या व्हिटॅमिन 'के'मुळे हाडे मजबूत होतात. तसेच बोन टिश्यू रिपेअर होण्यास मदत होते.
- अँटीऑक्सिडंटचे भरपूर प्रमाण असलेल्या टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन 'सी' आणि 'ए' असते. व्हिटॅमिन 'ए' डोळ्यांसाठी तसेच डिहायड्रेशनसाठी चांगले.
- केसांना चमकदार तसेच मजबूत बनवण्यासाठीही टोमॅटो फायदेशीर आहे.
- त्वचेला उजाळा मिळवून देण्यासाठी टोमॅटो खाणे चांगले.
- बिया नसलेल्या टोमॅटोचा सॅलडमध्ये वापर केल्यास किडनी स्टोनची शक्यता कमी होते.
- प्रतिकारक्षमता वाढते. तसेच तणावापासून दूर रोखण्यासाठीही टोमॅटो लाभदायक आहे.
- स्मोकिंगमुळे शरीराला होणाऱ्या नुकसानापासून वाचण्यासाठीही टोमॅटोचे सेवन फायदेशीर ठरते.



# तुम्ही झोपताना केस बांधून झोपता की मोकळे सोडून ?

**तुमचे केस लांबलचक असतील तर दिवसभर त्यांची निगा राखण्यास भरपूर वेळ तुम्ही घालवत असाल... पण, रात्री झोपताना काय करायचं हा मात्र प्रश्न तुम्हाला अनेकदा पडत असेल.**

**केस** मोकळे सोडले तर केसांचा गुंता होणार... आणि तो सोडवताना केस तुटणार... आणि बांधून ठेवले तर केसगळती वाढणार. असा अनुभव तुम्हालाही आला असेल. पण, यावर उपाय म्हणजे तुमचे केस कसे आहेत यावर झोपताना ते कसे बांधावेत हे अवलंबून आहे.

**केस स्ट्रेट असतील तर...**

तुमचे केस मोकळे आणि सरळ असतील तर रात्रीच्या वेळेस तुम्ही सैलसर पोनीटेल बांधून ठेवू शकता. म्हणजे ते सकाळी फ्रिझी होत नाहीत. सैलसर वेणी बांधून ठेवल्यास केसांमध्ये गुंता होणार नाही. तसेच त्यांना नॅचरल टॅंग्स मिळतील. तुमचे केस लांब असतील ते बांधून ठेवणे सोयीस्कर ठरते. पण खूप वेळ आणि घट्ट बांधून ठेवू नका. यामुळे केस तुटण्याची शक्यता अधिक आहे.



**केस ओले असतील तर...**

केस ओले असताना ते मूळीच बांधून ठेवू नका. परंतु केसांमधील गुंतागुंत कमी करण्यासाठी तुम्हाला ते बांधून ठेवणे गरजेचे वाटत असेल तर ते सुकल्यानंतरच बांधा. यामुळे ते तुटण्यापासून बचावतील. हाच नियम ब्लो ड्रायसाठीदेखील लागू होतो. शक्य असेल तर नैसर्गिकरीत्याच सुकवण्याचा प्रयत्न करा.

**कुरळ्या केसांसाठी**

तुमचे केस कुरळे असतील तर डोक्यावर त्याचा आंबाडा बांधा किंवा एका बाजूला बांधून ठेवा. यामुळे तुमची झोपमोड होणार नाही याची काळजी घ्या. पण तो खूप घट्ट बांधू नका.

# घरगुती क्रीम-साय

**सकाळी अंघोळ केल्यावर क्रीम लावले नाही तर एक-दोन तासांतच परत त्वचा ओढली जाते आणि कोरडीही होते. बाजारातल्या नवनवीन येणाऱ्या क्रीमचा वापर तर नेहमीच केला जातो. पण नेहमीच घरात उपलब्ध असणारे क्रीम म्हणजेच साय कधीतरी वापरून पाहा.**



- एक चमचा साय व लिंबाचा रस एकत्र करून रोज चेहऱ्यावर व ओठांवर लावल्यास ते फुटत नाही.
- थोडी साय व एक चमचा डाळीचे पीठ असे घरगुती उटणे साबणाला चांगला पर्याय आहे. त्यामुळे त्वचा मुलायम होते.
- मुलतानी माती बारीक करून सायीत मिसळून चेहऱ्यावर तसेच कोपऱ्यावर लावल्यास रंग उजळतो.
- तीन चार बदाम आणि दहा बारा देशी गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात एक चमचा साय मिसळून ते मिश्रण चेहऱ्यावर लावल्यास चेहऱ्यावरच्या सुरकुत्या आणि काळे डाग नाहीसे होतात.
- सायीत समुद्र फेसची बारीक पावडर मिळवून लावल्यास चेहऱ्यावरची मुरमे बरी होतात.
- मोसंबी किंवा संत्र्याची सालं वाटून त्यात साय मिसळून त्याचा लेप लावल्यास त्वचा मुलायम व स्वच्छ होते.
- एक चमचा साय व एक चमचा सफरचंदाचा रस एकत्र करून फेटून हलक्या हाताने चेहऱ्यावर मालीश केल्यास चेहऱ्याचा रंग उजळतो.
- थंडीच्या दिवसात खोकल्याचा त्रासही वाढतो. अशा वेळी अर्ध्या वाटी सायीत एक चमचा नारळाचा किस पाच मोठे वेलदोडे (पावडर) तसेच 10 मिरे भरडून बारीक गॅसवर परतून गरम करावे व झोपण्यापूर्वी गरमगरम खावे. थोडे दिवस असे केल्यास कोरडा खोकला बरा होतो.
- काशाच्या किंवा पितळी ताटलीत दोन चमचे ताजी साय थोडे पाणी घालून खूप फेटावे. साय हलकी होऊन लोण्यासारखी मऊ होईल. त्यात एक कापराची वडी बारीक करून मिसळावी. फोड, जखम यावर हे मलम लावल्यास फायदा होतो. हेच मलम लहान मुलांच्या टाळूवर घालून हलक्या हाताने मालीश केल्यास टाळू लवकर भरते व गरमीच्या दिवसात डोळ्याला थंडावा मिळतो.

# क्रॅटोमच्या पूरक औषधांनी आरोग्यावर दुष्परिणाम



**काही** वनौषधी कृत्रिम पूरकांच्या स्वरूपात घेतल्यास त्याचे आरोग्यावर वाईट परिणाम होतात, असे दिसून आले आहे. परदेशात जास्त वापरल्या जाणाऱ्या क्रॅटोम या वनौषधीच्या पूरकांमुळे आरोग्याची हानी होत असल्याचे पुरावे समोर आले आहेत. क्रॅटोम ही वनस्पती परदेशात लोकप्रिय असून तिचे वैज्ञानिक नाव मिट्रॅगना स्पेसिओसा आहे. ती कॉफी वर्गातील वनस्पती आहे. ऊर्जा वाढवणे व वेदना कमी करणे या दोन कारणास्तव आग्नेय आशियात मजूर लोक या वनस्पतीची पाने चावून खातात. क्रॅटोमचा वापर अमेरिकेत बेकायदेशीर मानला जात नाही. लोक ऑनलाइन त्याची खरेदी करतात. हिरव्या पावडरच्या स्वरूपात ही पूरक औषधी मिळते. क्रॅटोमचा अर्क सुरक्षित व नैसर्गिक मानला जातो. पण तो शरीरात गेल्यानंतर निष्क्रिय राहात नाही, असे संशोधकांचे मत असून अमेरिकेत त्याचा वापर अनेक वर्षे सुरू आहे. काही जण त्याचा वापर नैराश्यावर करतात, तर काहींना वेदना कमी करण्यास फायदा होतो. त्यात मिट्रॅग्नाइन हा ओपिऑइड पदार्थ असतो. या औषधीच्या वापरासाठी कुठलेही वैद्यकीय पुरावे नसले तरी त्याचा वापर अफूसारखा केला जातो. बुप्रेनोफाइनपेक्षा ही औषधी स्वस्त असते. न्यूयॉर्क विद्यापीठाचे विल्यम एगलस्टन यांनी याबाबत केलेल्या संशोधनानुसार याचे काही विषारी परिणाम हे ते औषध बंद केल्यानंतर दिसून येतात. 'जर्नल फार्माकोथेरपी' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. १ जानेवारी २०११ ते ३१ जुलै २०१८ दरम्यान लोकांनी या औषधाच्या केलेल्या वापराची माहिती घेऊन हे संशोधन करण्यात आले. त्यातून असे दिसून आले की, चिडचिडेपणा, गोंधळणे, वांत्या, भ्रम, कोमात जाणे, हृदयविकार असे परिणाम यातून होतात.

# आंब्याच्या पानांनी बनलेल्या चहाचे सेवन केल्याने गायब होतील आजार, जाणून घ्या याची रेसिपी

**आंब्याला फळांचा राजा म्हटले जाते. आंबा खाण्यास जेवढा चविष्ट असतो, तेवढाच आरोग्यासाठीदेखील फायदेशीर असतो. एवढंच नव्हे तर आंब्याच्या पानांमध्ये देखील बरेच गुण असतात. या पानांमध्ये बरीच व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. यात उपस्थित मंगिफेर्न नावाचा पदार्थ आरोग्यासाठी फारच फायदेशीर असतो. तुम्ही या पानांचा चहा बनवून त्याचे सेवन करू शकता. यामुळे पोटाशी निगडित बऱ्याच प्रकारचे आजार दूर होतात. आंब्याच्या पानांचा चहा तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.**



**आंब्याच्या पानांच्याचहाची रेसिपी :** हा चहा तयार करण्यासाठी आंब्याची पाने घ्या. ही पाने पाण्यात टाकून पाणी अर्धे होईस्तोवर उकळा. या पानांचा आपला वेगळा फ्लेव्हर असतो. म्हणून यात साखर मिसळायची गरज नसते. तुम्हाला हवे असेल तर यात आंबा किंवा पेरूचा रस मिसळू शकता. यानंतर या चहाला कपात गाळून घ्या आणि गरमागरम याचे सेवन करा.

**पोट ठेवेल निरोगी :** पोटाला निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही आंब्याची पाने पाण्यात टाकून उकळा आणि य पाण्याला एखाद्या भांड्यात रात्रभर ठेवा. दुसऱ्या दिवशी सकाळी या पाण्याला गाळून उपाशीपोटी याचे सेवन करा. याचे नियमित सेवन केल्याने पोटाशी निगडित सर्व समस्या दूर होण्यास मदत मिळेल.

**व्हेरिकोज व्हेन्सची समस्या दूर होईल :** व्हेरिकोज व्हेन्सची समस्या दूर करण्यासाठी आंब्याच्या पानांना आधी पाण्यात उकळून याचा चहा तयार करून त्याचे सेवन करा. यात तुम्ही पेरू किंवा आंब्याचा रसदेखील घालू शकता.

**अस्थमाच्या रुग्णांसाठी फायदेशीर :** आंब्याच्या पानांना उकळून त्या पाण्यात मध मिसळून त्याचे सेवन केल्याने ब्रॉन्कायटिस आणि अस्थमाची समस्या दूर होण्यास मदत मिळते. हा चहा खोकल्याला प्रभावीपणे ठीक करतो.

**ब्लडप्रेशरसाठी फायदेशीर :** उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांसाठी देखील आंब्याच्या पानांचा चहा तसेच आंब्याची पाने टाकून उकळलेल्या पाण्याने अंघोळ करणे फायदेशीर असते.

**मधुमेह रोग्यांसाठी फायदेशीर :** आंब्याच्या पानांमध्ये एंथोसाइनिडिन नावाचे टॅनिन असते, जे सुरुवातीच्या मधुमेहाच्या उपचारात मदत करते. आंब्याच्या वाळलेल्या पानांची पूड करून काढा बनवून त्याचाही प्रयोग केला जातो, जो मधुमेह अँजियोपॅथी आणि मधुमेह रेटिनोपॅथीच्या उपचारात देखील मदत करतो.

## मुंबईत ३ महिन्यांत छळाचे १२६ गुन्हे दाखल
# हुंड्याचा मोह मायानगरीतही

■**मुंबई** : महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातच नव्हे, तर मुंबईसारख्या शहरातही विवाहित महिलांचा हुंड्यासाठी छळ केला जात असल्याचे धक्कादायक वास्तव आहे. वेगवेगळी कारणे पुढे करून सासरच्या मंडळींकडून हुंड्यासाठी महिलांना शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या छळण्यात येत असून, मुंबईत जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत असे १२६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गेल्या वर्षी (२०२४) मुंबईत हुंडयासाठी कौटुंबिक छळाचे ४५८ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. यंदाच्या तीन महिन्यांतच आकडा सव्वाशेपार झाल्याने सरासरीमध्ये किंचित वाढ दिसते.

### हुंड्यासाठी 'मंगळदोष'
अग्रगण्य फॅशन कंपनीत उच्चपदावर असलेल्या महिलेचे लग्न एका संकेतस्थळावरून जमले. दोघांनी न्यायालयात जाऊन लग्न केले आणि नंतर कुटुंबीयांना सांगितले. कुटुंबीयांनी आधी संताप व्यक्त केला. मात्र नंतर रितीरिवाजानुसार लग्न लावून दिले. मुलीला मंगळ दोष असल्याने तीन लाख खर्च येईल, असे सांगून सासरच्यांनी पैसे घेतले. लग्नासाठी ९ लाख खर्च करायला लावले. काही महिने संसार सुरळीत चालला, मात्र नंतर सासरच्यांनी आपल्या रंग दाखवण्यास सुरुवात केली. कधी मंगळदोष, कधी जेवण बनविण्यास येत नाही, अशी कारणे पुढे करून माहेरून पैसे आणण्यासाठी त्यांनी शारीरिक आणि मानसिक छळ केला. याप्रकरणी देवनार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पतीने दिली पत्नीला साथ**

आयटी कंपनीत काम करणाऱ्या उच्चशिक्षित तरुणीचे बँकेत नोकरी करणाऱ्या तरुणासोबत लग्न जमले. बोलणीच्या बैठकीलाच आईवडिलांनी आमच्यात हुंड्याची प्रथा असल्याचे सांगितले. मुलीकडचे यासाठी तयार नव्हते. होणारा पतीदेखील हुंड्याच्या विरोधात होता. कसेबसे घरच्यांना राजी करून दोघांनी लग्न केले. चार ते पाच महिने चांगले गेल्यानंतर सासरच्यांनी टोमणे मारणे सुरू केले. सुनेकडे सगळा पगार मागून घेणे, लग्नातील दागिने आपल्या ताब्यात ठेवणे, घरातील कामावरून मानसिक त्रास देण्यात आला. अशा परिस्थितीत पतीने मात्र तिची साथ सोडली आणि दोघे घराबाहेर पडले आणि स्वत्रंत राहू लागले. तरुणीच्या तक्रारीवरून गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**चारित्र्यावर संशय**

माहेरून पैसे आणत नाही म्हणून गर्भवती महिलेच्या चारित्र्यावरच संशय घेण्यात आल्याचा प्रकार ट्रॉम्बेमध्ये घडला. गर्भवती राहिल्याने महिलेला डॉक्टरने जड काम करू नये, असा सल्ला दिला. त्यानुसार ही महिला हलके काम करू लागली. घरातील सर्व कामे करत नाही म्हणून सासरच्या मंडळींनी तिचा छळ सुरू केला. मानसिक त्रासाची पातळी इतकी खाली घसरली की, पोटातील मूल कोणाचे आहे, असा प्रश्न उपस्थित करून हिची डीएनए चाचणी करा, असे वारंवार बोलू लागले. पतीदेखील घरच्यांची बाजू घेत असल्याने महिलेने अखेर पोलिसांत धाव घेतली.

**चालू वर्षातील गुन्हे (जाने–मार्च २०२५) गुन्ह्याचा प्रकार आणि संख्या**
- हुंड्यामुळे मृत्यू - १
- आत्महत्या - ५
- मानसिक, शारीरिक छळ - १२०

**वर्ष आणि गुन्ह्यांची नोंद**
- २०२३ - ७६६
- २०२४ - ४५८
- २०२५ - १२६ (जानेवारी ते मार्च)



# गॅस मीटरबाबत सरकारचा मोठा निर्णय! कठोर झाले नियम... ग्राहकांवर काय परिणाम होणार?

■**मुंबई** : केंद्र सरकारने गॅस मीटरबाबत मोठा निर्णय घेतलाय. घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वापरासाठी वापरल्या जाणाऱ्या गॅस धारकांवर याचा परिणाम दिसणार आहे. सर्व गॅस मीटर वापरण्यापूर्वी त्यांची चाचणी, पडताळणी आणि मुद्रांकन हे अनिवार्य असेल. यासंदर्भातील प्रस्ताव देणारे नवीन मसुदा नियम तयार करण्यात आले आहेत. सर्वसामान्य ग्राहकांना याचा फायदा होणार आहे.

ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने गॅस मीटरसंदर्भात महत्वाचे नोटिफिकेशन जाहीर केलंय. गॅस वापरात असताना त्यांची अचूकता सुनिश्चित करण्यासाठी नियम आहेत. यानुसार गॅस मीटरची पुनर्पडताळणी देखील निश्चित करण्यात आलीय. गॅस मापनात अचूकता, पारदर्शकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करणे हे कायदेशीर मापनशास्त्र (सामान्य) नियम, २०११ अंतर्गत तयार केलेल्या या नवीन नियमांचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. या नियमांअंतर्गत अधिकृत आणि स्टॅम्प केलेले गॅस मीटर असल्यास जास्त शुल्क आकारणे किंवा कमी मोजमाप असे नेहमी होणारे वाद कमी होतील. तसेच त्यामुळे सदोष किंवा छेडछाड केलेल्या मीटरपासून ग्राहकांना दिलासा मिळणार आहे.



### कंपन्यांसाठीही संरचित चौकट
मानकीकृत उपकरणांमुळे वाजवी बिलिंग, सुधारित ऊर्जा कार्यक्षमता आणि देखभाल बचतीचा फायदा ग्राहकांना होणार आहे. ग्राहकांच्या फायद्यांव्यतिरिक्त नवीन नियमांअंतर्गत 'उत्पादक' आणि 'गॅस वितरण कंपन्या' साठी एक संरचित चौकट तयार केली जाणार आहे. ही चौकट आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धती आणि आंतरराष्ट्रीय कायदेशीर मापनशास्त्र संघटनेच्या मानकांशी सुसंगत असेल. मसुदा नियम तयार करण्यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ लीगल मेट्रोलॉजी, रीजनल रेफरन्स स्टँडर्ड लॅबोरेटरीज, उद्योग तज्ञ आणि स्वयंसेवी ग्राहक संघटना यांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली एक तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच भारतीय मानक ब्युरोला मसुद्याची तपासणी करण्याची आणि वैज्ञानिक आणि तांत्रिक माहिती देण्याची जबाबदारी सोपवण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

**प्रत्येक पैलूवर चर्चा**

उत्पादक, चाचणी प्रयोगशाळा, शहर गॅस वितरण कंपन्या आणि राज्य कायदेशीर मापन विभागांसह भागधारकांना मसुदा नियमांबद्दल मोठ्या प्रमाणात जागरुक करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

भागधारकांच्या बैठका आणि आंतर-विभागीय सल्लामसलतीच्या अनेक फेऱ्या घेण्यात आल्या. ज्यामध्ये नियामक आवश्यकता आणि नियमांची अंमलबजावणी सुलभता यांच्यात संतुलन साधताना प्रत्येक पैलूचा सर्वसमावेशकपणे विचार करण्यात आल्याचे नोटिफिकेशनमध्ये म्हटलंय. चर्चेनंतर नियमांना अंतिम स्वरूप देण्यात आलं.

# ठाणेकरांची भिस्त टँकरवरच... पाणी समस्या सोडविण्यास पालिकेला अपयश

■**ठाणे** : ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागाप्रमाणेच ठाणे शहरातील घोडबंदर भागातील कावेसर, मानपाडा, कासारवडवली, वाघबीळ, ओवळा मोघरपाडा आणि आनंद नगर, शिवाई नगर तसेच आदी भागात पाणीटंचाईच्या तीव्र झळा जाणवत आहेत. एकीकडे उन्हाचा तडाखा आणि दुसरीकडे पाण्याचा दुष्काळ यामुळे ठाणेकरांना पाण्याच्या टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. ठाण्यातील सर्वात वेगाने विकास आणि उच्चभ्रू परिसर म्हणून घोडबंदर परिसराची ओळख आहे. या परिसरात मागील दोन ते तीन महिन्यांपासून रहिवाशांना कधी कमी दाबाने तर कधी पाणीपुरवठाच होत नसल्याची बाब समोर आली आहे. परिणामी येथील रहिवाशांना टँकरच्याच पाण्यावर अवलंबून रहावे लागत आहे. येथील परिसराला रोजच्या रोज २५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याची माहिती महापालिका सूत्रांनी दिली. त्यात टँकरपासून सुटका मिळावी यासाठी वाढीव पाण्याची मागणी करण्यात आली आहे. परंतु अद्यापही घोडबंदरला वाढीव पाणी उपलब्ध होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात पाणीटंचाईच्या समस्या तीव्र होत असताना, आता शहरी भागात देखील पाणीटंचाईचे चटके बसू लागले आहे. ठाणे शहरासह घोडबंदर परिसराचा विस्तार झपाट्याने होत आहे. या भागात निवासी गृहसंकुलांचे मोठमोठे इमले उभे राहू लागले आहे. मात्र, ठाणे पालिकेला येथील गृहसंकलांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. सध्याच्या घडीला ठाणे शहराला चार स्त्रोतांमार्फत दररोज ५८५ दशलक्षलिटर इतका पाणीपुरवठा करण्यात येतो. नव्याने विकसित झालेल्या घोडबंदर भागातील इमारतींमधील रहिवाशांना टँकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत आहे.



### पाण्यासाठी नागरिकांची प्रतीक्षाच
ठाणे महापालिकेने भातसा धरणातून १०० दशलक्षलिटर तर मुंबई महापालिकेकडून २० दशलक्षलिटर वाढीव पाणी देण्याची मागणी केली होती. मुंबई महापालिकेने २० दशलक्षलिटर वाढीव पाणी देण्यास मंजुरी दिली होती. मुंबई महापालिकेच्या जलवाहिनीवरून कोपरी, किसननगर आणि वागळे इस्टेट या भागांना वाढीव २० दशलक्षलिटर इतके पाणी देण्यासाठी जलवाहिनी जोडणीची कामे हाती घेतली असून यामुळे या तिन्ही भागांना फायदा होऊ लागला आहे. मात्र, अद्यापही घोडबंदरप्रमाणे इतर नागरिकांना मात्र पाण्याची प्रतीक्षाच करावी लागत आहे. ठाणे शहरात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात भेडसावत असून यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**टँकरच्या माध्यमातून पालिकेची कमाई**

घोडबंदर भागातील कावेसर, मानपाडा, कासारवडवली, वाघबीळ, ओवळा मोघरपाडा आणि आनंद नगर आदी भागात प्रतिदिन सुमारे २५ टँकरने पाणीपुरवठा होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. यामध्ये १० ठिकाणी मोफत तर, १५ ठिकाणी एक हजार रुपये आकारून महापालिकेच्या माध्यमातून टँकर देण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे घोडबंदरवासीयांना टँकरशिवाय पर्याय नसल्याचे दिसून येत आहे.

# ठाण्याचा पाणी प्रश्न निकाली काढण्यासाठी काळू धरण महत्वपूर्ण



■**ठाणे** : ठाणेसह, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापुर, भिवंडी, भिवंडी ग्रामीण याभागातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी महत्वपूर्ण असलेले काळू धरण कालमयार्देत पूर्ण करण्यात यावे. त्यासाठी संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयातून भूसंपादन, पुनर्वसन कामांना गती द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई येथे दिले. मंत्रालयात यासंदर्भात झालेल्या बैठकीस जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, जलसंपदा विभागाचे प्रकल्प समन्वयक सचिव संजय बेलसरे, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले आदी अधिकारी यावेळी उपस्थित होते. पालघर जिल्हाधिकारी आणि ठाणे, पालघर जिल्ह्याचे वन विभागाचे अधिकारी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. मुंबई महानगर क्षेत्रातील शहरांमधील पाणी प्रश्न निकाली काढण्यासाठी काळू धरण प्रकल्प महत्वाचा आहे. बऱ्याच वषार्पासून प्रकल्प मंजूर असून खासगी भूसंपादन, वन जमीन भूसंपादन, पुनर्वसन ही कामे तातडीने प्रशासकीय यंत्रणांनी पूर्ण करणे गरजेचे असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. काळू प्रकल्पाकरीता बाधित होर्णाया वन जमिनींच्या मोबदल्यात पयार्यी वनीकरण करण्यासाठी पालघर जिल्ह्यात उपलब्ध जमिनीची माहिती पालघर जिल्हाधिकार्यांनी सोमवारपर्यंत कळविण्याचे निर्देश यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी दिले. ठाणे जिल्हाधिकारी यांनी जमीन संपादनासाठीच्या प्रशासकीय बाबींसाठी विविध यंत्रणांमध्ये समन्वयाचे काम करावे. या प्रकल्पामुळे जी गावे बाधित होणार आहेत त्यांचा पुनर्वसन आराखडा तातडीने तयार करून भूसंपादनाला गती देण्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

## पुण्यातून जुनी वाहने खरेदी-विक्री करताय?
# मग आधी जाणून घ्या आरटीओचा मोठा निर्णय

ज्यांना जुनी गाडी विकायची किंवा खरेदी करायची आहे ते गाडी डीलरकडे देतात. पण सगळी प्रोसेस झाल्यावरही वाहन लगेचच ग्राहकाच्या नावे करण्यात येत नाही. दुसरीकडे, त्या डीलरकडून ते वाहन कोणी खरेदी केले, तर त्या खरेदीदाराच्या नावावर ते वाहन केले जाते. यामध्ये अनेकदा वेळ जातो आणि दरम्यानच्या काळात त्या वाहनाचा गैरवापर होण्याचे प्रकार घडले आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने जुन्या वाहनांची खरेदी-विक्री करणाऱ्या व्यावसायिकांना परवाना देण्याचा धोरण तयार केले आहे. या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत नव्हती.



■**पुणे** : पुण्यात रोजच्या वापरासाठी जास्तीतजास्त गाड्या वापरल्या जातात. सार्वजनिक वाहनांपेक्षा पर्सनल गाडी तिकडे जास्त वापरल्या जातात. यामुळे पुण्यात वाहनांचे व्यवहार दर वर्षी मोठ्या प्रमाणात होत असतात. या खरेदी-विक्रीमध्ये अनेकदा फसवणुकीचे प्रकार घडतात. नागरिकांनी आपल्या वाहनाची विक्री डीलर्सकडून केली तरी अनेक महिने त्या वाहनाची नोंदणी संबंधित आधीच्याच नागरिकांच्याच नावे राहते. यामुळे अशा वाहनांचा बेकायदा कामांसाठी वापर केला जात असल्याचे लक्षात आले. यामुळेच पुणे प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) जुन्या वाहन खरेदी व विक्री करणाऱ्या डीलरना अधिकृत परवाना देण्याचा निर्णय घेतला आहे.

पुणे शहरात जुनी वाहने खरेदी-विक्रीचे मोठे 'मार्केट' आहे. छोट्यातले छोटे आणि मोठ्यातले मोठे असे या विक्रीचे डीलर्स आहेत. एवढंच नाही तर बाहेरच्या राज्यातूनही अनेक लोक अशी वाहने खरेदीसाठी येतात. जुनीच वाहने असूनही या वाहनांची खरेदी-विक्री लाखो रुपयात होते. पण यामध्ये अनेक फसवणुकीचे प्रकार घडत असल्याचे लक्षात आले.

**आता कोणाची नावे वाहन होणार?**

जुन्या वाहनांची खरेदी-विक्री करणाऱ्या व्यावसायिकांना अधिकृत परवाना देण्याचा निर्णय घेतण्यात आला आहे. आता 'आरटीओ'कडे अर्ज केल्यानंतर कायदेशीर प्रक्रिया पार पाडून या वाहन खरेदी-विक्रीचा अधिकृत परवाना देण्यात येणार आहे. जुन्या वाहनांची खरेदी-विक्री करणाऱ्या डिलर्सला पुणे 'आरटीओ'कडे '२९ अ'नुसार अर्ज केल्यानंतर 'आरटीओ'कडून अधिकृत विक्रीचे प्रमाणपत्र दिले जाईल.

## गृहनिर्माण प्रकल्पाच्या जाहिरातीत महारेराची माहिती ठळक हवी
# अन्यथा विकासकाला ठोठावणार दंड

■**मुंबई** : गृहनिर्माण प्रकल्पांच्या सर्व प्रकारच्या जाहिरातींसोबत महारेरा नोंदणी क्रमांक, महारेरा संकेतस्थळाचा तपशील आणि क्यूआर कोड प्रकल्पाचा जाहिरातीतील संपर्क क्रमांक आणि पत्ता यात ज्याचा फॉन्ट मोठा असेल त्या फॉन्टमध्ये छापणे महारेराने बंधनकारक केले आहे. त्याचप्रमाणे महारेराचा सर्व तपशील जाहिरातीच्या वरील भागात उजवीकडे रंगीत मजकुरात छापणे अत्यावश्यक आहे. याबाबतचे निर्देश महारेराने जारी केले आहेत. हा निर्णय तातडीने लागू करण्यात आला आहे. आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या विकासकांवर ५० हजारांपर्यंत दंड ठोठावला जाणार आहे. महारेरा नोंदणी क्रमांक, महारेरा संकेतस्थळ, क्यूआर कोड ठळकपणे छापणे यापूर्वीच अनिवार्य केले आहे.




**विकासकांनी सहकार्य करावे**

विकासक आपल्या गृहनिर्माण प्रकल्पांत जास्तीत जास्त गुंतवणूक व्हावी, यासाठी वर्तमानपत्रे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, इन्स्टाग्राम, ट्विटर, लिफलेटस, पोस्टर्स, व्हॉट्सअप तत्सम समाज माध्यमे आणि विविध माध्यमांमार्फत आपल्या प्रकल्पाच्या गुणवैशिष्ट्यांची जाहिराती करत असतात. या जाहिरातींमध्ये महारेरा क्रमांक, महारेरा संकेतस्थळ, क्यूआर कोड विहित आकारात छापणे बंधनकारक आहे. ग्राहकांसाठी असलेल्या या निर्णयाच्या अंमलबजावणीत विकासकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महारेराने केले आहे.

# अंधेरीतील ३२ वर्षीय विवाहिता प्रेमात पडली
## खारच्या लॉजमध्ये मर्जीने शरीरसंबंध, अचानक रोहितने...

■**मुंबई** : ३२ वर्षीय विवाहित महिलेला तिचाच मित्र ब्लॅकमेल करत असल्याचा प्रकार मुंबईतील अंधेरी भागात उघडकीस आला आहे. आरोपी रोहित उर्फ रामप्रसाद नारायण पांडे याने महिलेचे काही खासगी व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली होती. त्याने महिलेकडे दोन लाख रुपयांची मागणी केली. या प्रकरणी खार पोलिसांनी त्याला अटक केली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला अंधेरीमध्ये आपल्या कुटुंबासोबत राहते. तिची ओळख रोहितशी झाली. रोहित तिथेच जवळ काम करत असे. दोघांची मैत्री झाली आणि ते एकमेकांच्या जवळ आले. त्यांची मैत्री पुढे जाऊन प्रेमसंबंधात बदलली. ते नेहमी एकमेकांना भेटत होते.

काही महिन्यांपूर्वी, रोहितने महिलेला खारला भेटायला बोलावले. त्याने तिला एका हॉटेलमध्ये नेले. तिथे दोघांमध्ये शारीरिक संबंध आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे संबंध दोघांच्या मर्जीने झाले होते. ते अनेकवेळा भेटले आणि त्यांनी शारीरिक संबंध ठेवले. पण, रोहितने त्यांच्या भेटीचे काही व्हिडिओ गुपचूप आपल्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड केले. महिलेला याची कल्पना नव्हती.

नंतर, रोहितने ते व्हिडिओ दाखवून महिलेला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. ₹जर तू मला २ लाख रुपये दिले नाहीस, तर मी हे व्हिडिओ सोशल मीडियावर टाकेन,₹ अशी धमकी त्याने दिली. महिलेला खूप मानसिक त्रास झाला आणि तिने पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

पोलिसांनी रोहितवर लैंगिक शोषण, खंडणीसाठी धमकावणे आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करत, जुहू पोलिसांच्या मदतीने रोहितला विले पार्ले परिसरातून पकडले. नंतर त्याला खार पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. आता त्याच्यावर कायदेशीर कारवाई होणार आहे.

पोलिसांनी सांगितले की, महिलेने तक्रारीत म्हटले आहे, ₹रोहितने मला व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली आणि पैशांची मागणी केली.₹ या धमकीमुळे ती खूप घाबरली होती. खार पोलीस स्टेशनच्या एका अधिका[illegible]याने सांगितले की, ₹आम्ही आरोपीला अटक केली आहे आणि या प्रकरणाचा तपास करत आहोत.₹

आरोपीने महिलेचे खासगी व्हिडिओ तिच्या नकळत काढले. हे व्हिडिओ वापरून तो तिला त्रास देत होता. पोलिसांनी त्याच्यावर कठोर कारवाई केली आहे. अशा घटनांपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. अनोळखी व्यक्तींवर लवकर विश्वास ठेवू नये, असेही पोलिसांनी सांगितले आहे.

# पुण्यात घडली अति भयानक घटना... पतीचे पत्नीसह अघोरी कृत्य

■**पुणे** : पिंपरी चिंचवडमध्ये पती- पत्नीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना घडली आहे. पोटगी मागितल्यानं पतीनं तीच्यावर जादूटोना केला आहे. चारित्र्याच्या संशयावरून भांडण होत असल्याने या पती पत्नीने वेगळं होण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर महिलेने कौटुंबिक न्यायालयात पोटगीसाठी अर्ज दाखल केला होता. पोटगी मागितल्यानं पतीनं तीच्यावर अघोरी कृत्य केल्याचं केले आहे. पिंपरी चिंचवडच्या विशाल नगर भागामध्ये राहणाऱ्या 36 वर्षीय महिलेला पतीच्या अघोरी कृत्याचा सामना करावा लागला आहे. चारित्र्याचा संशय घेत असल्यामुळे सातत्याने होत असलेल्या भांडणांना कंटाळून महिलेने पतीपासून विभक्त राहण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर कौटुंबिक न्यायालयात पोटगीसाठी अर्ज दाखल केला. पीडित महिला विभक्त राहिला लागल्यानंतर पतीने राहत्या घरातील वस्तू दुसऱ्या ठिकाणी हलवण्यास सुरुवात केल्याची माहिती पत्नीला मिळाली. मुलांची वह्या पुस्तक आणि इतर काही साहित्य घेण्यासाठी पत्नी घरामध्ये गेली असता पतीने दरवाजा बंद करत पत्नीच्या गळ्याला कोयता लावत तिच्यावर बलात्कार केला आणि त्यानंतर हातामध्ये हळद-कुंकू घेऊन महिलेच्या गुप्तांगावर लिंबाच्या रस पिळत तुला वेडी करतो अशी धमकी दिली



यात्प्रकरणी पिंपरी चिंचवड मधल्या सामाजिक कार्यकर्त्यांनी आवाज उठवला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवत पिढीतेला सहाय्य करण्याचं आवाहन त्यांनी केले. यात्प्रकरणी सांगवी पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला असून सांगली पोलीस त्याचा पुढील तपास करत आहे. पोलीस या गुन्ह्यातील आरोपीवर कारवाई करतील ही पण अजूनही अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकलेल्या समाजाला बाहेर काढायचं कसं हाच खरा प्रश्न आहे.

# पत्नीला घेण्यास गेला आणि पिटाळून लावलं, सासरच्या छळाला कंटाळून कंडक्टरचं टोकाचं पाऊल

■**नाशिक** : प्रेमविवाह केलेल्या मुलीला सासरचे मंडळी घेवून गेले. तरुण मुलीला भेटण्यसाठी गेला. मात्र त्याला सासरच्यांनी विरोध केला. त्यामुळे त्यांच्या त्रासाला कंटाळून संदीप भिमराव निकम (२८, रा. हातगाव, ता. चाळीसगाव) या तरुणाने आत्महत्या केली. या प्रकरणी सासरच्या मंडळींविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, हातगाव येथील संदीप निकम हा नाशिक येथे सिटी लिंकमध्ये कंडक्टर म्हणून नोकरीस होता. त्याठिकाणी त्याचे एका तरुणीसोबत प्रेमसंबंध निर्माण झाले आणि त्यांनी नाशिक येथे प्रेमविवाह केला होता. त्यानंतर संदीप हा पत्नीला घेवून आपल्या मूळगावी आला होता. दि. ८ रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास मुलीचे आई, वडील, भाऊ व काकांसह चार ते पाच जण हातगाव येथे आले होते.




### घर रिकामे करण्यावरून महिलेस मारहाण
घर खाली करण्याच्या कारणावरुन महिलेला बेदम मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात पती, पत्नीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील शिव पार्वतीनगरात २९ वर्षीय महिला राहते. या महिलेच्या खालच्या घरात भाडेकरू राहतात. गत ३ ते ४ महिन्यापासून भाडेकरून पती-पत्नीने फिर्यादी महिलेस अवमानकारक वक्तव्य केले. दरम्यान, घरमालक महिलेने भाडेकरूंना घर खाली करून द्या, असे सांगितल्याचा राग आल्याने फिर्यादी महिलेस मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी महिलेच्या फिर्यादीवरून हेमराज पाटील व त्यांच्या पत्नीविरोधात चाळीसगाव शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**...तर तुज्या नवऱ्याला सोडणार नाही**

त्यांनी दोघांचे लग्न थाटामाटात लग्न लावून देतो असे सांगत तरुणीला सोबत घेवून जातो असे सांगितले. मात्र त्या तरुणीने त्यांच्यासोबत जाण्यास नकार दिला होता. त्यावेळी तरुणीच्या कुटुंबियांनी आमच्यासोबत नाही आली तर तुज्या नवऱ्याला सोडणार नाही अशी धमकी दिली होती. यावेळी मुलीने चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला तक्रारही दिली होती.

**पत्नीला घेण्यास गेला अन् पिटाळून लावले**

संदीप हा पत्नीला घेण्यासाठी नाशिक येथे गेला. मात्र तेथे तिच्या कुटुंबियांनी भेटू न देता त्याला शिवीगाळ करीत पिटाळून लावले होते. त्यामुळे संदीप हा मानसिक तणावात होता. सासरच्यांनी दिलेल्या त्रासामुळे संदीप हा खचून गेला होता, त्यामुळे त्याने गळफास घेत आपली जीवनयात्रा संपविली होती. याप्रकरणी मिथून भिमराव निकम यांनी दिलेल्या फियार्दीवरून पाळदे मळा, बेलदगव्हाण, देवळाली कॅम्प येथील मुलीचे आई-वडील, भाऊ व मुलगी अशा पाच जणांच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १03, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००01४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com